अमृत कुंभ

वर्ष 8 | अंक 6 | फेब्रुवारी-मार्च 15 | मूल्य रु. 10/-

१.सोलापूर :'७ अरब सत्कर्मांची महायोजना' या कार्यक्रमाचे अंतर्गत आयुक्त श्री. गुडेवार व ब्र. कु. रामप्रकाश (न्यूयॉर्क) यांचा सत्कार करतांना ब्र. कु. सोमप्रभा दीदी व रेणुका बहेन. **२. केसनंद (पुणे)** : विद्यमान आमदार श्री. बाबुराव पाचर्णे यांचे स्वागत करतांना ब्र. कु. भाग्यश्री बहेन, सोबत सचिन जाधव. **३. वाशी (नवी मुंबई)** : बौद्ध भिक्षूंना ईश्वरी संदेश दिल्यानंतर, त्यांच्या समवेत ब्र.कु.शीला दीदी, ब्र.कु.मीरा व नीलम बहेन. **४. देगलूर (महाराष्ट्र)** : विधायक श्री. सुभाषराव साबणे यांना ईश्वरी भेटवस्तू देतांना ब्र.कु. भगवान भाई (शांतिवन), ब्र.कु. सुनंदा व नंदा बहेन. **५. भुसावळ** : 'व्यसनमुक्ती महारैली' चे उद्घाटन प्रसंगी आमदार श्री. सावकारे, डॉ. वसंत चौधरी, श्री. नेमाडे, ब्र.कु. जयश्री बहेन व अन्य. **६. भंडारा** : आमदार ॲड.श्री. अवसरे यांचा सत्कार केल्यानंतर, त्यांच्या समवेत ब्र.कु. शांता दीदी व शोभा दीदी, ब्र.कु. सुशील व ज्योती बहेन **७. नेवासा** : विज्ञान प्रदर्शनात गटशिक्षण अधिकारी श्रीमती अलकाताई जंगले ह्या ब्र.कु. वंदना बहेन यांना प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करताना. **८. सोनई (राहूरी)** : अभिनेत्री ग्रेसी सिंग यांना ७ अरब सत्कर्मांच्या महायोजनेची माहिती दिल्यानंतर, त्यांच्यासोबत ब्र.कु. उषा व दीपक हरके

परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच "मन्मनाभव।''

अमृतकुंभ

वर्ष ८ । अंक ६ । फेब्रुवारी - मार्च २०१५

मुखपृष्ठाविषयी

हिंदु, मुस्लिम, शीख व खिस्ती सर्वजण आपापसात भाऊ-भाऊ आहेत, अशी घोषणा तर बहुतेक लोक करतात. परंतु ते हे जाणत नाहीत की सर्वांचा पिता कोण आहे. देहाच्या दृष्टीने हे भाऊ-भाऊ नसले तरी आत्मिक दृष्टीने ते सर्व एक परमात्म्याची मुले असल्याने भाऊ-भाऊ आहेत. प्रत्येक धर्माचा संस्थापक वेगवेगळा असला तरी सर्व धर्माचे अनुयायी निराकार ज्योतिस्वरूप शिव परमात्म्याच्या प्रतिमेला (शिव-लिंगाला) या ना त्या रूपाने पूजतात.

हिंदु लोक 'ॐ नमः शिवाय' असे गायन व पूजन करतात. मुसलमानांच्या मक्का येथील मुख्य तीर्थ-स्थानात एक अशाच आकाराचा पाषाण आहे. त्याला ते लोक 'संग-ए-असवद्' व भारतातील लोक मक्केश्वर म्हणतात. गुरु नानकही एक निराकार ज्योतिस्वरूपाची महिमा गात असत. येशू खिस्तही म्हणत असत की 'गॉड इज लाइट' अर्थात परमात्मा एक ज्योति आहे. यावरून हे स्पष्ट होते की परमात्मा एक प्रकाश (Light) आहे. एक ज्योति अथवा नूर आहे. तो सर्व गुणांचा सागर आहे. तो सत्य आहे, शिव आहे, सुंदर आहे.

शेवटी सर्व बांधवांना महाशिवरात्रीच्या कोटी-कोटी मंगलकामना! -- *प्रकाशक, अमृतकुंभ.*

वार्षिक वर्गणी रु. ६०/-
अर्धवार्षिक वर्गणी रु. ३०/-
आजीव सभासद वर्गणी रु. १,३००/-

E-magazine **साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या** www.amrutkumbh.com

-- अं त रं ग --

- आपल्या बोलण्या-चालण्यात श्रेष्ठता हवी २
- महाशिवरात्रीच्या शुभपर्वावर, अवतरले शिव सर्वेश्वर (संपादकीय) ३
- प्रभूप्रेमात रंगले अंतरंग ६
- ईश्वरी कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था... ९
- त्वमेव माताच पिता त्वमेव १२
- अमृतवेला १४
- सचित्र सेवावृत्त १५
- आपल्या संपन्न आत्मस्थितीला तडा देणारा खतरनाक मनोविकार - मोह १९
- तणावाचे कारण व निवारण २४
- वर्णमालेत गवसले जीवनमर्म (भाग १६) २७
- वाचकांशी हितगुज २९
- ७ अरब सत्कर्मांची महायोजना ३०
- सत्कर्मांसाठी माझे योगदान (फॉर्म) ३२

फोटो, लेख, आदी पाठविण्याचा पत्ता :
संपादक - अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३
फोन : ०२२-२५३२२२०८. मोबाईल : ९८२००२३०९२
E-mail :info@amrutkumbh.com

वर्गणी पाठविण्याचा पत्ता : बी.के.गोदावरी,
प्रकाशक अमृतकुंभ द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्,
ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३.

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे मुखपत्र 'अमृतकुंभ' द्वैमासिक मुद्रक व प्रकाशक बी.के.गोदावरी यांनी परफेक्ट प्रिंट, २२ ज्योति इंडस्ट्रियल इस्टेट, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे (पश्चिम) - ४००६०१ येथे छापून प्रजापिता ब्रह्माकुमारीज, लाईट हाउस, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) - ४००६०४ येथे प्रसिद्ध केले - संपादक ब्र.कु.शिवाजी चौधरी.

संगणक अक्षरजुळणी : कु.मनिषा गोवळकर, ८ श्रीसदिच्छा सोसायटी, मीठ बंदर रोड, ठाणे (पूर्व) - ४०० ६०३.

आपल्या बोलण्या-चालण्यात श्रेष्ठता हवी, एक दुसऱ्यासाठी सन्मान व स्नेहभाव हवा, म्हणजे वायुमंडळ शक्तिशाली बनेल

-- दादी जानकीजी.

अव्यक्त बापदादांच्या मधुर मीलनासाठी मधुबनला जाणे म्हणजे शांती व प्रेम, खुशी व शक्ती यांचा अपार खजिना जमा करणे होय. आता संगमयुगात एक आहेत शिवबाबा, दुसरं म्हणजे मी आत्मा आहे व तिसरी गोष्ट म्हणजे शिवबाबांनी इतका मोठा अविनाशी यज्ञ रचला आहे. इतका मोठा ब्राह्मण परिवार आहे. त्यामुळे महिमा करावी ती कोणाची, आपल्या भाग्याची की भगवंताची? यज्ञाची का समयाची, का परिवाराची? ब्राह्मण परिवाराला पाहून सदैव एक गीत आठवते - 'जिसकी रचना इतनी सुंदर, वो (रचयिता) कितना सुंदर होगा'.

रचयिता परमपिता शिव परमात्मा (शिवबाबा) संगमयुगात अवतरित होऊन, आपल्याला सृष्टीच्या आदि-मध्य-अंताचे ज्ञान देतात त्यामुळे रोज ज्ञानमुरली लक्षपूर्वक अभ्यासावी. शिवबाबा कसे येतात व केव्हा येतात? कलियुगाचे अंती जेव्हा देवी-देवता धर्माचे नावनिशाण देखील उरत नाही. भक्त देवी-देवतांची पूजा करतात परंतु ते स्वतःला देवी-देवता समजत नाहीत तसेच अशुद्ध खानपान व फॅशन यांच्यामुळे धर्माची ग्लानी होते. अशा धर्मग्लानीच्या वेळी शिव परमात्म्याचे अवतरण होते. ते आपल्याला स्वधर्माची ओळख करून देतात. शांती हा आपला स्वधर्म आहे. परंतु जेव्हा आपण शुद्ध अर्थात पवित्र बनू तेव्हाच शांती स्वधर्मात राहू शकू.

शिवबाबा अतिशय दयाळू व कृपाळू आहेत. ते आपल्याला हेच सांगतात की 'तुम्ही स्वतःला आत्मा समजून, माझी आठवण करा म्हणजे मी तुमच्या पूर्व जन्मातील तसेच या जन्मातील विकर्मांची क्षमा करीन. तुमच्या मागील विकर्मांचा विनाश करीन, त्याचबरोबर श्रेष्ठ कर्म करण्यासाठी शक्ती प्रदान करीन.' म्हणूनच प्रत्येकाने 'मी शिवबाबांचा, शिवबाबा माझे' ही भावना मनात दृढ धरली पाहिजे तसेच दुसऱ्यांनाही शिवबाबांचा परिचय दिला पाहिजे. त्यासाठी आधी स्वतः ज्ञानाची धारणा करा नंतर दुसऱ्यांना ज्ञान सांगा कारण जितकी आपली धारणा असेल तितकीच सेवा होते. ज्ञान आणि योगाच्या धारणेनेच आजवर सेवा झाली आहे. ज्ञान आणि योगाचे प्रत्यक्ष प्रमाण आहे धारणा अर्थात ब्राह्मण जीवन.

आता फक्त एकच गोष्ट करा की आपल्या मनात साधारण तसेच व्यर्थ संकल्पांना येऊ देऊ नका नाहीतर तशी सवय लागेल. एक दुसऱ्याला पाहून आपल्या बोलण्या-चालण्यात श्रेष्ठता हवी, वायब्रेशन (प्रकंपन) शक्तिशाली हवेत, एक दुसऱ्यासाठी सन्मान, सत्यता व प्रेम हवे. कारण प्रेम असेल तर आपल्याला कुणाचे अवगुण दिसणार नाहीत. सर्वांचे गुण तेवढे दिसतील. वास्तविक साधारण पुरुषार्थी जीवन हे खरे जीवन नव्हे, यात कुठलाही आदर्श नाही. आपल्याला आदर्श बनण्यासाठी शिवबाबांनी जे ज्ञान दिले आहे, त्याआधारे सदैव आत्मअभिमानी स्थितीत राहा. राजयोगी अर्थात कर्मयोगी बनून राहणे. कर्मयोगी हाच खरा योगी होय. ड्रामाअनुसार ज्ञानात येण्यापूर्वी देखील मी कुठलेही वाईट कर्म केले नव्हते. तथापि शिवबाबांनी आता आपल्याला जे श्रेष्ठ कर्म करायला शिकवले आहे त्यात फार मोठी शक्ती आहे. आता ब्राह्मण जीवनात श्रीमतानुसार तन-मन-धनाने श्रेष्ठ कर्म करून, गती-सद्गती प्राप्त करायची आहे.

मनापासून सेवा केल्यानेच 'अथक भव'चे वरदान प्राप्त होते. फलस्वरूप कधी थकावट येत नाही. मुखातून कधी रफ शब्द निघत नाहीत. **समजा तुम्ही खूप सेवा केली परंतु एखादा रफ शब्द बोलतात तर त्यात सेवा काय झाली? बोलणे व चालणे यात समानता असेल तरच ती खरी सेवा होय. त्याद्वारेच नशा व खुशी प्राप्त होते.** बाकी नशेत तर नुकसान आहे पण हा नशा लक्ष्मी-नारायण बनण्याचा आहे. लक्ष्मी-नारायण अर्थात लक्षण तसे असले पाहिजेत. शिवबाबांनी सांगितले आहे की स्वदर्शनचक्र फिरवित राहा.

▶ पान क्र. ५ वर

संपादकीय..

महाशिवरात्रीच्या शुभ पर्वावर, अवतरले शिव सर्वेश्वर

जशी दिवसानंतर रात्र आणि रात्रीनंतर दिवस असे हे कालचक्र अव्याहतपणे चालू असते; या कालचक्रातील दिवस आणि रात्र यांचा कालावधीही ठरलेला आहे. त्याचप्रमाणे ब्रह्माचा दिवस आणि ब्रह्माची रात्र यांचाही कालावधी सुनिश्चित आहे. या सृष्टिचक्ररूपी नाटकाचे चार भाग आहेत - सत्ययुग, त्रेतायुग, द्वापरयुग व कलियुग. प्रत्येक युग हे १२५० वर्षांचे असून एका सृष्टिचक्राचा कालावधी ५००० वर्षांचा आहे. यातील सत्य आणि त्रेतायुगाच्या २५०० वर्षांच्या कालावधीला ब्रह्माचा दिवस असे म्हटले जाते. तसेच द्वापरयुग व कलियुगाच्या २५०० वर्षाच्या कालावधीला ब्रह्माची रात्र म्हणतात. **ब्रह्माची रात्र जेव्हा संपायला येते त्यावेळी ज्ञानसूर्य शिव परमात्मा अवतरित होतो व सृष्टीवरील अज्ञान अंधःकार दूर करतो. म्हणूनच ज्ञानसूर्य शिव परमात्म्याच्या अवतरणाला महाशिवरात्री अथवा शिवजयंती असे म्हटले जाते.**

महाशिवरात्री महोत्सव माघ वद्य चतुर्दशीला येतो, त्यामागे देखील आध्यात्मिक रहस्य आहे. रात्री हा शब्द अज्ञान, अधर्म, अपवित्रता वा तमोप्रधानतेचे प्रतीक आहे. वद्य पक्षाच्या चतुर्दशीच्या रात्री घोर अंधार असतो. शिवाय माघ महिना हा वर्ष संपण्यापूर्वीचा महिना आहे. म्हणूनच माघ वद्य चतुर्दशीला महाशिवरात्री साजरी करण्याचा अर्थ असा आहे की, कलियुग पूर्ण होण्याच्या आधी काही वर्षे परमपिता शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण होते. त्यावेळी संपूर्ण सृष्टी अज्ञान अंधःकारात बुडून गेलेली असते. मनोविकार व आसुरी लक्षणे यांचा कळस सर्वत्र पहायला मिळतो. अशा धर्मग्लानीच्या वेळी अधर्माचा विनाश व एक सत्धर्माची स्थापना करण्यासाठी परमात्म्याचे दिव्य अवतरण प्रत्येक कल्पाच्या अंती होते. याचेच गायन गीतेतही केले आहे, 'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्...' (अध्याय ४/८).

आपणा सर्वांना हे जाणून अति हर्ष होईल की कलियुगाचे अंतिमसमयी सन १९३६ मध्ये, निराकार शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण, साकार माध्यम प्रजापिता ब्रह्मा यांच्या शरीरात झाले आहे. त्यामुळे आपण यावर्षी ७९ वी शिवजयंती मोठ्या आनंदाने व उत्साहाने साजरी करीत आहोत. याविषयीचे वर्णन एका कवीने अतिशय सुंदर शब्दात केले आहे -

निराकार शिव साकार होतसे।
ब्रह्मातनाचा तो आधार घेतसे।
नव्या युगाच्या निर्माणास्तव,
अवतरले शिव सर्वेश्वर।
शिवरात्रीच्या शुभ पर्वावर...

❒ शिव मंदिरातील नंदी कशाचे प्रतीक आहे?

महाशिवरात्रीला शिव मंदिरात गेल्यानंतर भक्तगण प्रथम नंदीची पूजा करतात. एवढंच नव्हे तर त्याच्या शिंगातून शिवलिंगाचे दर्शन घेतात. परंतु भक्त हे जाणत नाहीत की नंदी कशाचे प्रतीक आहे. वस्तुतः प्रजापिता ब्रह्माबाबा ज्यांच्या शरीरात अवतरित होऊन निराकार शिव परमात्मा सत्य-गीता-ज्ञान देतात, त्यांचे प्रतीक नंदी आहे. त्याचबरोबर प्रजापिता ब्रह्मा हे शिव परमात्म्याचे एकमेव माध्यम असल्याने, कुठल्याही मनुष्यात्म्याची शिव परमात्म्याशी भेट प्रजापिता ब्रह्मा यांच्याद्वारेच होते. म्हणूनच नंदीच्या दोन शिंगातून शिवलिंगाचे दर्शन घेण्याची प्रथा आहे. **या अनुषंगाने त्रिकालदर्शी ज्ञानसागर शिव परमात्म्याची पुढील महावाक्ये अतिशय बोधप्रद आहेत, 'दिखलाते है ना रथ पर अर्जुन को ज्ञान दिया। अब एक को थोडे ही बैठ गीता ज्ञान सुनायेंगे? यह सभी रांग (गलत) है। रथ तो वास्तव में प्रजापिता ब्रह्मा का साकार तन है। भाग्यशाली रथ वा नन्दीगण है। है तो मनुष्य, परन्तु मन्दिरोमें फिर बैल को रख दिया है। अर्थ चाहिए ना। सच तो है मनुष्य तन। इनको नन्दीगण कहा जाता है। बाप इन पर सवार होते है।'**

❒ महाशिवरात्री हेच शुभपर्व

महाशिवरात्रीचे पर्व हे परमात्म्याच्या दिव्य अवतरणाचे यादगार पर्व असल्याने ते सर्वात शुभ तसेच महानतम् पर्व आहे. शिव परमात्मा कलियुगाचा अंत व सत्ययुगाचा आदि यांचा संधीकाळ अर्थात संगमयुगात अवतरित होतात व ब्रह्मामुखकमलाद्वारे सत्य गीता ज्ञान व सहज राजयोगाचे शिक्षण देतात. याच्या धारणेनेच मानव देवतातुल्य बनतो. याचेच गायन आजही केले जाते, 'नर ऐसी करनी करे, जो नर से नारायण बने और नारी ऐसी करनी करे, जो नारीसे श्रीलक्ष्मी बने।' अशाप्रकारे कलियुगाची अज्ञान रात्र संपून सत्ययुगाची नवप्रभात उदयाला येते. ही भारतभूमी पुन्हा स्वर्गभूमी बनते. **या अनुषंगाने परमात्मा शिव पित्याची पुढील महावाक्ये प्रत्येकाने आपल्या हृदयात जरूर साठवावीत - 'तुम सर्वशक्तिवान बाप से योग लगाते रहो। जिस योगबल से तुम विश्व के मालिक बनते हो। तुम हो गुप्त शिवशक्ति सेना। शिवबाबा से योग लगाकर शक्ति ले रहे हो। स्वर्ग की राजधानी स्थापन करने वाला, गॉडफादर आते ही है तुम्हे स्वर्ग का मालिक बनाने।'**

यावरून आपल्या लक्षात आले असेल की महाशिवरात्रीचे पर्व विश्व परिवर्तन आधार आहे, म्हणूनच त्याची महिमा अपरंपार आहे. याचेच प्रतीक म्हणून जेव्हा स्वस्तिकाचे चित्र काढले जाते तेव्हा कलियुगाच्या अंतिम भागाकडे वरती 'शुभ' व सत्ययुगाच्या आदिभागाकडे 'लाभ' असे लिहिले जाते. हे सर्व जाणल्यानंतर साहजिकच प्रत्येकाला वाटेल की आपणही सत्ययुगी महाराजा-महाराणी पद प्राप्त करावे. त्यासाठी आपण परमात्मा शिव पित्याद्वारे स्थापित प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरी विश्व-विद्यालयाला अवश्य भेट द्यावी. आज या संस्थेच्या १३५ देशांतून सुमारे ९००० शाखा निःस्वार्थ भावनेने सेवारत आहेत. खरं तर हे शिव पित्याचे (शिवबाबांचे) कार्य आहे. बाकी सर्व निमित्त मात्र आहेत. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे ब्रह्माद्वारे नवीन दुनियेच्या स्थापनेचे हे ईश्वरी कार्य संपन्नतेच्या अगदी समीप आहे. त्यामुळे या शिवरात्रीला संस्थेच्या नजीकच्या सेवाकेंद्रात जाऊन ज्ञान अमृताचे पान अवश्य करा व अमर-लोकीचा वारसा परमात्मा शिव पित्याकडून प्राप्त करा.

❒ शिव परमात्माच सर्वेश्वर

शिव परमात्माच सर्व आत्म्यांचा पिता, परमपिता आहे. तो निराकार आहे. तोच सर्व आत्म्यांचा परमशिक्षक व सद्गुरु आहे. सर्वांना मुक्ती व जीवनमुक्ती प्रदान करणारा आहे. तोच सर्व आत्म्यांचा लिबरेटर व गाइड आहे. तोच ब्रह्मा, विष्णु व शंकर या त्रिदेवांचा रचयिता असल्याने, त्यालाच त्रिमूर्ती शिव भगवान असे संबोधले जाते. (म्हणूनच शिवलिंगावर त्रिपुंड लावले जाते व तीन पानाचे बेलपत्र अर्पित केले जाते.) भगवान सदा विदेही, अशरीरी, अव्यक्त, अभोक्ता, सदा पावन, जन्म-मरण रहित, वर्ल्ड ऑलमाइटी अथॉरिटी, सर्व शक्तिवान, पतितपावन आहे. त्यामुळे अन्य कुठल्याही देवी-देवतांना भगवान मानणे अयथार्थ आहे. शिव परमात्माच देवांचाही देव महादेव तसेच सर्वेश्वर आहे. सर्व धर्मात त्याचीच मान्यता आहे.

हिंदू लोक शिव परमात्म्याला मानतात. सोमनाथ, अमरनाथ, पशुपतीनाथ इत्यादी बारा ज्योतिर्लिंगे शिव परमात्म्याचीच स्मरणचिन्हे आहेत. गोपेश्वर तसेच रामेश्वर येथील मंदिरा-वरून स्पष्ट होते की शिव परमात्मा, श्रीकृष्ण तसेच श्रीराम या देवतांनाही पूज्य होते. मुसलमानांच्या मक्का येथील मुख्य तीर्थस्थानातही शिवलिंगाच्याच आकाराचा पाषाण आहे. त्याला ते 'संग-ए-असवद्' असे म्हणतात. महंमद पैगंबराने त्याची स्थापना केली असे मानतात. ख्रिश्चन धर्माचा संस्थापक जीझस् ख्राइस्ट व शीख धर्माचा संस्थापक गुरुनानक यांनीही परमात्म्याला ज्योतीच मानले आहे. यहूदी लोक तर परमात्म्याला जेहोवा या नावाने संबोधतात जो शिव शब्दाचा अपभ्रंश असावा असे वाटते. जपानमध्येही बौद्ध धर्माचे कित्येक लोक अशा आकाराची एक प्रतिमा आपल्यासमोर ठेवून त्यावर आपले मन एकाग्र करतात.

तात्पर्य म्हणजे आत्मिक दृष्टीने आपण सर्व एक परमात्मा शिव पित्याची मुले आपापसात भाऊ-भाऊ आहोत. हे सत्य जाणल्यानेच विश्वात शांती, सद्भावना, एकता व बंधुभाव निर्माण होईल. म्हणूनच एक ईश्वर, एक विश्व परिवार (*One God, One World Family*) हा महत्वपूर्ण संदेश प्रजापिता ब्रह्माकुमारीज् संस्थेद्वारे विश्वभरात नुकताच देण्यात आला. परंतु अज्ञान-निद्रेत गाढ झोपी गेलेल्या

कुंभकर्णासारखी आजच्या माणसाची स्थिती आहे. बहुतेक लोक ईश्वरी संदेश एका कानाने ऐकतात व दुसऱ्या कानाने सोडून देतात. परिणामतः दिवसेंदिवस मनुष्याचे झपाट्याने अधःपतन होताना दिसत आहे. प्रिय बंधूंनो, आपण मात्र तसे करू नका. वर्तमान-समयी परमात्मा शिव अवतरित होऊन आपल्याला जे ईश्वरी ज्ञान आणि सहज राजयोग शिकवित आहेत, त्याद्वारे आत्म्यात आध्यात्मिक जागृती उत्पन्न करा. याचेच प्रतीक म्हणून भक्तगण महाशिव-रात्रीला जागरण करतात. यादिवशी ते उपवासही करतात परंतु उपवासाचा खरा अर्थ ते जाणत नाहीत. उपवास अर्थात (उप-समीप वा निकट, वास - राहणे) परमात्म्याच्या समीप राहणे अर्थात आपल्या मन-बुद्धीने परमात्म्याशी योगयुक्त होणे. याद्वारेच मनुष्य देवतातुल्य बनतो. तात्पर्य म्हणजे महिमा सारी एक शिव सर्वेश्वराचीच आहे, म्हणूनच भक्तिमार्गात 'शिव परमात्माय नमः' असे गायन केले जाते.

❒ शिव परमात्मा भारतातच स्वर्ग स्थापन करतात

आपणा सर्व भारतीयांना हे जाणून अतिशय आनंद होईल की परमपिता शिव परमात्मा प्रत्येक कल्पात भारतातच स्वर्ग स्थापन करतात. किंबहुना भारतात स्वर्ग स्थापण्यासाठीच परमात्म्याचे दिव्य अवतरण होते. म्हणूनच शिव परमात्म्याला 'हेवनली गॉड फादर' (स्वर्गाचा रचयिता) असेही संबोधले जाते. **परमात्मा शिव हे ब्रह्मा, विष्णु व शंकर या त्रिदेवांचे निर्माता असल्याने, त्यांना 'त्रिमूर्ती शिव भगवान' असेही म्हणतात. ते ब्रह्माद्वारे सत्ययुगी दैवी सृष्टीची (स्वर्गाची) स्थापना, शंकराद्वारे कलियुगी आसुरी दुनियेचा विनाश व विष्णुद्वारे दैवी सृष्टीची पालना करवितात. म्हणूनच शिव परमात्म्याला कर्ताकरविता असेही म्हटले जाते.** भक्तिमार्गात शिव व शंकर यांना एकच मानले जाते परंतु शिव परमात्मा रचयिता आहे व शंकर देवता रचना आहे. शिव परमात्मा परमधाम निवासी आहे व शंकर देवता सूक्ष्म लोकनिवासी आहे. अशारीतीने ज्ञानसागर शिव परमात्मा अवतरित झाल्यानंतरच मनुष्य आत्म्यांना सत्य ज्ञान प्राप्त होते आणि या ज्ञानानेच सद्‌गति प्राप्त होते अर्थात भविष्य २१ जन्मांकरिता स्वर्गाचे राज्यभाग्य प्राप्त होते.

या अनुषंगाने शिव परमात्म्याची पुढील महावाक्ये अतिशय सुस्पष्ट आहेत, 'मीठे बच्चे, बाप भारत में आते ही है स्वर्ग रचने लिए। तो भारतवासी स्वर्गवासी, स्वर्ग के मालिक होने चाहिए। शिवजयन्ति भी भारतमें ही मनाते है, तो जरूर भारत को कुछ दिया होगा। अभी तुमको स्वर्ग की बादशाही दे रहे है ना। बाप अनेक बार आये है स्वर्ग की स्थापना करने। नरक का विनाश हो जाना है।'

तात्पर्य म्हणजे महाशिवरात्रीच्या महाकल्याणकारी पर्वाला ओळखा व परमात्मा शिव पित्याकडून स्वर्गाचा (सदा सुखाचा) वारसा हक्क प्राप्त करा, हीच परममंगल शुभभावना व शुभकामना! त्यासाठी सर्वप्रथम आपले सत्य स्वरूप ओळखा. स्वतःला आत्मा समजून, परमात्मा शिव पित्याची प्रेमपूर्वक आठवण करा. तसेच आपले जीवन-पुष्प शिव परमात्म्यावर अर्पण करा. हाच भाव पुढील काव्यपंक्तीतून सुंदररीतीने व्यक्त होतो -

आत्मज्योत जागवूनी, जागृती करू।
ज्योतिर्बिंदू परमात्मा, अंतरी स्मरू।
जीवन पुष्प हे, वाहु शिवा वरी।
हर्षभरे शिव जयंती, करू साजरी।।

▶ पान क्र. २ वरून

आपले पहिले बोट दर्शवते की कोण; दुसरे बोट दर्शविते की कोणाचा आणि तिसरे बोट दर्शविते स्वदर्शन चक्र अर्थात आपण कल्पापूर्वीचेच आहोत तसेच पुढील कल्पातही असू.

सेवेत जरासुद्धा अभिमान नसावा तेव्हाच संपूर्ण समर्पण म्हटले जाईल. कित्येक जण समर्पण होऊन देखील सेवा करीत नाहीत आणि काही जण सेवा करतही असले तरी ते सेवेच्या अभिमानातून सुटत नाहीत. याला काय म्हणावे? **जरी तन-मन-धन समर्पित केले तरी आपल्या दृष्टी-वृत्तीत संपूर्ण पवित्रतेची धारणा, व्यवहारात सत्यता, नम्रता, मधुरता या गोष्टींकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. मी अमुक सेवाकेंद्राची इन्चार्ज आहे, झोन इन्चार्ज आहे, या सर्व गोष्टी डोकं खराब करणाऱ्या आहेत. मी तर ना कुठल्या झोनची इन्चार्ज आहे, ना कुठल्या सेवाकेंद्राची. माझे कुठलेही सेंटर नाही, कुठलाही झोन नाही, माझा कोणी स्टुडन्ट नाही. मी एकदम फ्री आहे. बस, मी आत्मा शिवबाबांची आहे त्यानंतर सर्वांची आहे.** ❖❖❖

प्रभूप्रेमात रंगले अंतरंग

ब्र.कु.गुणवंत पाटील, बिबवेवाडी-पुणे.

प्रेम हा माणूसपण शोधण्याचा सुंदर मार्ग आहे. याच मार्गाने आम्ही प्रभूपित्याच्या जवळ जाऊ. देवत्वाकडे वाटचाल करण्याची ही सहज वाट आहे. प्रेमाचा उदगम जे हृदय (अंतर्मन) ते आपल्याला जन्मापासून मिळते पण बुद्धी म्हणजे समज ही आपले घर, शाळा, समाज यांच्याकडून मिळते. हृदय सकारात्मक प्रेम शिकवते पण बुद्धीचा धर्म हा नकारात्मकच जास्त असतो. हृदय मोठी गोष्ट छोटी करते याउलट बुद्धीला विस्तारात जास्त रस असतो.

तसे पाहिले तर या देहमंदिरात मन आणि बुद्धी यांचे भिन्न पण महत्वाचे स्थान आहे. बुद्धीने ज्ञानाचा दीप सदैव तेवत ठेवायचा तर मन हे प्रभूप्रेमाने भरून घ्यायचे आहे. तेव्हा दोघेही मनुष्य जीवनात तेवढेच महत्वाचे आहेत. या दोघांचे पावित्र्य कायम ठेवले पाहिजे, तरच प्रभूप्रेमाची निर्मलता, सार्थकता अनुभवता येईल.

आमचे प्रभूप्रेम जेवढे आंतरिक, खरे तेवढे भाग्य थोर. पद्मापद्म भाग्याचे तेव्हाच आपण मानकरी होऊ. पण हे प्रेम जर बौद्धिक, दिमागी असेल, बुद्धी प्रामाण्यावर आधारित असेल तर ते अविनाशी नसते. ते समयाप्रमाणे परिस्थिती-नुसार बदलू शकते, कमी वा संपूही शकते. ते कुणा व्यक्तीच्या संगामुळे असेल तर ती व्यक्ती संपर्कात असेल तोवरच टिकेल. संगाचा रंग हा इंद्रधनुष्याप्रमाणे असतो. इंद्रधनुष्य पावसाळ्यातच दिसते.

म्हणून प्रेमा तुझा रंग कसा हे सांगता येणार नाही, पण खऱ्या प्रेमात मात्र अंतरंग जरूर मिसळलेले असते, हे नक्की. खरे प्रेम आकाशाएवढे असते. खरं तर प्रेम वर्णन करायचं नसते, तर ते अनुभवायचे असते. आज सारेच दरवाजे बंद झाले आहेत, तशीच त्यात असलेल्यांची मनेही बंद आहेत. प्रेमानेच ही कवाडे उघडतील. प्रेम ही सर्वात मोठी परिवर्तन शक्ती आहे. एकत्र संगठनमध्ये काम करू लागलो की प्रेमही सहज जमू लागते. प्रेमाने विश्वास निर्माण झाला की आनंदाने जगणेही सहज जमून जाते. प्रभूप्रेमाचा, प्रभू मीलनाचा आनंद लुटता-लुटता मग मरजीवा होण्याचे सहज जमावे. एकाने प्रेमाची सुंदर व्याख्या केली आहे - *Love decides what is wrong instead of who is wrong.*

प्रेम हे चवीसारखे असते. जर पेढ्यातच चव आहे तर तो हातात असतानाच कळायला हवी आणि जर चव जीभेत आहे तर पेढा खायची गरज काय? वास्तविक चव जीभेतही नाही आणि पेढ्यातही नाही तर ती दोघांच्या मीलनात उत्पन्न होते. **त्याचप्रमाणे आत्मा आणि परमात्मा यांचे स्वतंत्र अस्तित्व असले तरी जीवनाची सार्थकता, संपन्नता त्यांच्या मीलनात आहे. हे उदात्त श्रेष्ठ, मंगल मीलन म्हणजे प्रेम. हे प्रेम हृदयातून पाझरते.** आपल्या हृदयातील खऱ्या प्रेमाचा, स्नेहाचा पाझर हा कधीच आटत नाही. कारण हे प्रेम - प्रभूप्रेम पवित्र आणि अविनाशी आहे. या प्रेम पाझराला दिशा देणे हीच आत्म्याची खरी साधना!

परमात्म स्नेह हा परिस आहे. आत्म्याला पूर्णत्व देण्याची ताकद या प्रेमातच आहे. आपल्या प्रेमाची ही शक्ती ओळखता आली पाहिजे. प्रेम ही हिऱ्यासारखी तेजस्वी, अमूल्य वस्तू आहे. हिऱ्याचे मूल्य त्याला पैलू पाडल्यानंतरच वाढते. दुसऱ्यांना प्रेम वाटणे हे त्याला पैलू पाडण्यासारखे आहे. हृदयापासून सर्व आत्म्यांना प्रेम वाटण्यानेच, देण्यानेच आपण साऱ्या जगाला स्नेही बनवतो. प्रेम वाटूनच वाढते. खरा भक्त जसा इष्ट देवतेच्या प्रेमात आकंठ बुडतो तेव्हाच त्याच्या भक्तीचा गंध वाढतो. प्रभूप्रेम हे निरपेक्ष निःस्वार्थ आहे, रुहानी-आत्मिक आहे. **या प्रभूप्रेमात रंगलेला ज्ञानी हा थोर विशाल अंतःकरणाचा असतो. त्याचं प्रेम जरी ईश्वरावर जडले असले तरी ते सर्वांसाठी असते. सारं विश्व त्याचे वाटेकरी असते. तो सर्वांना भरभरून प्रेम देत असतो. म्हणूनच ईश्वरीय प्रेम संगमयुगी ब्राह्मण जीवनाचा आधार आहे. ज्ञानी साऱ्या विश्वाच्या कल्याणासाठी चिंतित असतो.**

प्रेमाची प्रामाणिक भाषा फक्त ईश्वराला कळते. इतरांना ते प्रेम उमजण्यासाठी तेवढेच खरे, प्रामाणिक असावे लागते.

म्हणूनच निर्मळ, शुद्ध हृदयाचा ज्ञानी-योगीच प्रभूला आवडतो. त्याचे खरे आंतरिक प्रेमच त्याला भावते. त्याचे समर्पणच प्रभू स्वीकारतो. हे समर्पित प्रेमच आत्म्याचा हुंकार आहे. हा हुंकार परमात्म्यापर्यंत पोहोचण्यासाठीच प्रेमाच्या अंतःकरणात पवित्रतेचा ओलावा हवा.

दिव्यत्वाचा स्पर्श हा फक्त खऱ्या प्रेमीलाच होऊ शकतो. त्यासाठी आपले प्रेम जीवंत, डोळस हवे, त्यात कुठलाही किंतु, परंतु वा विकल्प नको, त्यात शुद्ध तन्मयता, ओढ हवी तरच स्वतःचे अस्तित्व विसरूनच समर्पित होता येते. माझे मीपण विसरणे म्हणजेच प्रभू स्मृतीत दंगणे, लवलीन होणे, प्रभूसमान होणे.

प्रेमी तर सर्वच आहेत पण एक प्रेम हृदयातून उत्पन्न होते, तर दुसरे मतलबी, स्वार्थवश होते, स्वार्थापोटी होते. तिसरे प्रेम हे नाईलाजाने, परिस्थितीजन्य असते. पहिल्या प्रेमात सर्व संबंध, सर्व प्राप्ती सहज अनुभवता येतात. एकही संबंध कमी नाही. जशी वेळ, समय तसे संबंध वा नाट्यातील आपुलकीच्या छटा अनुभवाला येतात. वेळेवर, प्रत्यक्ष प्रमाण देणारे, परिस्थितीला अनुरूप असे ते प्रेम असेल. उदाहरणार्थ शिकताना शिक्षकाच्या रूपात तर कधी सखा वा दोस्त रूपात गप्पा-गोष्टीद्वारे सुसंवाद साधण्याचा निर्भेळ आनंदही घेता येईल; पण आपण जेव्हा विद्यार्थ्याच्या नात्याने संबंध जोडतो, तेव्हा मात्र सखा रूपात संवाद करणे योग्य नाही. ही आहे स्नेह वा प्रेम निभावण्याची रीत. त्या त्या संबंधाने वा नात्याने होणारी प्राप्तीही तेव्हाच यथार्थ म्हणता येईल.

समजा कधी मन भारी आहे, सचिंत आहे, तणावग्रस्त आहे. खरं तर असं होऊ नये पण त्या कलियुगात वेळ, परिस्थिती, समस्या प्रभावी ठरली की असे होते, त्यावेळी मग ज्या नात्याने, संबंधाने संपर्क करू इच्छितो ते नाते, तो संबंध निभावणे अवघड होईल. तेव्हा हे निभावणे युक्ती-युक्त व्हावे. वास्तविक तेव्हा आपल्या प्रेमाची, स्नेहाची जातकुळी जर अटल, अखंड, अचल असेल तर प्रेमाची एकरूपता, एकरसता आपली अनुभूती होईल. नाहीतर जशी वेळ, परिस्थिती वा मनःस्थिती (*mood*) बदलत राहील तशी ही प्रेमाची, स्नेहाची अवस्थाही बदलत राहील. ती अवस्था सदा एकरस, एकरूप राहाण्यासाठी हे प्रेम खरे अंतःकरणातून असावे. मग ते व्यक्ती, समय, वेळ, परिस्थिती यापैकी कशानेही प्रभावित होणार नाही. आपले प्रेम निःस्वार्थी, निरपेक्ष तर असावेच पण त्या प्रेमात हृदयाचा, आपुलकीचा, आत्मियतेचा ओलावाही असावा. आजच्या या कलियुगी दुनियेत खरे आत्मिक प्रेम कुठे शिल्लक आहे? असले तरी त्याला लोभ, मोह, स्वार्थाचा वास आहे.

एकदा एका राजाने एका अधिकाऱ्याला, एका सुभ्याची सुभेदारी दिली. तसे अधिकारपत्र देण्यापूर्वी राजाने त्याला काही आवश्यक सूचनाही दिल्या. तेवढ्यात एक बालक खेळत-खेळत राजाजवळ आले. राजाने मोठ्या प्रेमाने त्या मुलाला उचलून घेतले आणि विविध आवाज काढून त्याला खेळवू लागला. हे पाहून तो अधिकारी राजाला म्हणाला, महाराज, माझ्या घरी तर चार मुले आहेत परंतु त्यांना मी असे प्रेम कधीच दिले नाही. हे ऐकून राजा एकदम गंभीर झाला. त्याने त्या व्यक्तीला दिलेले अधिकार पत्र परत घेतले आणि त्याचे तुकडे-तुकडे केले. मग राजा म्हणाला, मला तुझ्या नेमणुकीचे वाईट वाटते. जर तू मुलांशी प्रेमाने वागू शकत नसशील तर तुझा व्यवहार प्रजेशी कसा असेल? तुझ्या हृदयातील प्रेमाची पवित्र धारा आटून गेली आहे, आता या पदासाठी तू योग्य नाहीस.

आम्हालाही प्रभूप्रेमास पात्र व्हावे लागेल. आज आत्मा विकारांनी, पतित बनला आहे. असा पतित, विकारी आत्मा परमात्म्याला कसा आवडेल, म्हणूनच ईश्वरी ज्ञानाच्या आधारे पावन होण्याचा पुरुषार्थ केला पाहिजे. असा पवित्र, पात्र आत्माच ईश्वरी गुण, शक्ती प्राप्तीसाठी अधिकारी ठरेल. विकारी, पतित आत्मा मात्र अशा प्राप्तीं-पासून नेहमीच वंचित राहील. **परमात्म्याचे प्रेम हे पतित आत्म्याला पावन बनविणारे, त्याचे परिवर्तन करणारे चुंबक (*magnet*) आहे. ईश्वरी प्रेमाचा संबंध हृदयाशी आहे. हे प्रेम दोन हृदयांना जोडणारा दुवा आहे. या प्रेमानेच मने जोडली जातील.** आई-वडीलांचे, भावा-भावांचे, भाऊ-बहिणीचे, पति-पत्नीचे नाते निभावणारे लौकिक प्रेम आहे. ते कधी तुटूही शकते, त्याची खात्री नाही, कारण ते स्वार्थ,

अपेक्षांवर निर्भर असते. त्याची विभागणी व्हायला वेळ लागत नाही. परंतु परमपित्याचे प्रेम हे अभंग, अतूट असते. त्याच्या वाटा-वाटीने सारेच आपले सहयोगी बनतात.

परमात्मा शिव पिता चैतन्य बीजरूप आहे. बीजाला स्नेहाचे पाणी दिले की ते वृक्षाच्या प्रत्येक पानाला सहज मिळते. प्रत्येक पानाला वेगळे पाणी देण्याची गरज नसते. या पारलौकिक पित्याच्या प्रेमाने सर्वच आपले आपोआप स्नेही बनतात. आपल्या हृदयाची वाटणी होत नाही. प्रत्येक कर्म या प्रेमाने सहज सिद्ध होते, मेहनत घ्यावी लागत नाही. प्रेमामुळे याद-आठवण सहज होते. प्रेमीला सहज विसरता येत नाही. खऱ्या प्रेमामुळे सर्व संबंधांचा रस अनुभवता येतो. खरे प्रेम हे महापुरासारखे असते. तेथे स्वार्थाचे, अपेक्षांचे किनारे हरवतात. या प्रेमात फक्त देणे असते, फक्त देणे. पण या देण्यातून होणारी कमाई मात्र अनंत असते, अमाप असते.

ज्ञानी बुद्धीने याद करतो. त्याची याद ज्ञानयुक्त असते. पण प्रभूप्रेमी अंतःकरणातून याद करतो. तेथे ज्ञानापेक्षा, विचारापेक्षा भावना वरचढ असते. जेथे विचार तेथे मेहनत असते, पण भावनेचा फुलोरा फुलला की प्रेमही मुक्तपणे सहज बहरते. तात्पर्य ज्ञानी हा मेहनतीचे फळ खातो तर दिलवाला योगी हा उत्कट प्रेमाचे फळ चाखतो. केवढे अंतर आहे! प्रत्यक्षातही बुद्धीने केलेली सेवा थकवते तर अंतःकरणातून स्फुरलेल्या प्रेमाने अथक सेवा घडते.

ज्ञानीचे-बुद्धीवादीचे व्यर्थ संकल्प खूप चालतील कारण तो जेथे तेथे बुद्धी लढविल. का, कसे, केव्हा या प्रश्नांनी त्याची बुद्धी ठायी-ठायी कुंठीत होईल. त्यामुळे त्याला सदा युद्ध करावे लागते. पण जेथे प्रेम आहे, स्नेह आहे तेथे युद्ध नाही. स्नेही सदा स्मृतीत लवलीन राहील. त्याची याद आणि प्रेम एकरस राहील. असा प्रेमीच प्रभूला जास्त प्रिय असतो, असा प्रेमी नम्रही असतो.

पतंग (परवाना) प्रश्नांच्या कोळीष्टकात कधीच अडकत नाही. तो ज्योतीवर बेधडक स्वाहा होतो, समर्पित होतो. प्रभूपित्यावर हार्दिक, जिगरी प्रेम करणारे सहज बलिहार जातात. तेथे दुविधा नसते, असते फक्त समर्पण. प्रभूशी एकता, समानता आणि समरसता. प्रेमाचे प्रतीक आहे, हृदय-दिल. ब्राह्मणाकडे दिल आणि दिमाग (मन व बुद्धी) दोन्ही आहेत. तरीही त्याची याद निरंतर राहात नाही. तो वारंवार परमपित्याला विसरून जातो. कारण ईश्वरी ज्ञान त्याच्या बुद्धीपर्यंतच सीमित राहाते. मी आत्मा आहे, परमात्मा शिव माझा पिता आहे, तो भाग्यविधाता आहे. ही फक्त बौद्धिक समज राहाते. पण ही समज जेव्हा जाणीव-नेणीवेच्या पातळीवर हृदयापर्यंत खोलवर रुजते, भिडते, त्यात सामावते तेव्हाच ही याद, ही स्मृती स्थायी होते, टिकते. परमात्म प्रेमाने अनेक वरदानांनी आपली झोळी भरपूर होते. या संपन्नतेतून प्राप्त होणारी खुशी संतुष्टता अलौकिक आहे. ती इतर बाह्य गोष्टींनी कधीही प्रभावित होणार नाही.

म्हणून लौकिक व्यक्ती, वस्तु, वैभव, पदार्थाच्या प्रेमापोटी होणारा लगाव-झुकाव अर्थात आकर्षण, मोह हा फसवा, खोटा, भ्रामक, नुकसान करणारा आहे. आज आरामाची साधने खूप वाढली आहेत, **तेव्हा या आरामात राम (शिव) विसरला जाऊ नये. खरी सीता (पार्वती) होऊन राहण्यातच कल्याण आहे. सीता जोपर्यंत ईश्वरी मर्यादेची लक्ष्मणरेषा ओलांडत नाही तोपर्यंत ती सुरक्षित आहे, नाहीतर सुवर्ण-मृगाच्या मोहाने संकटात सापडू शकते, हे ओळखणे सुज्ञ-पणाचे होईल.** आपल्या गरजा जितक्या कमी असतील त्या प्रमाणात परमेश्वराचे सान्निध्य समीपता, समानता वाढत जाईल. परमपित्याने आपल्याला त्याच्या हृदयसिंहा-सनावर बसविले आहे. तसेच आपल्या हृदयात दिलाराम बापच आहे ही जाणीव सदा ठेवली तर त्याच्या स्नेह आणि शक्तीचे आपण अधिकारी होऊ.

स्नेह आणि शक्ती या दोघांच्या समानतेचे प्रतीक आहे, पिताश्री ब्रह्माबाबा. म्हणून ब्रह्माबाबांना पुरुषार्थात 'फॉलो फादर' केले पाहिजे. त्यांचा स्मृतीदिवस हा अशी समानता अनुभवण्याच्या वरदानाचा दिवस आहे. बापदादांच्या स्नेहा-मुळेच प्रत्येक आत्मा स्वतःला शक्तिशाली आणि भाग्यशाली अनुभव करतो. स्नेहाचे प्रत्यक्ष स्वरूप आहे समान होणे. हे आत्मिक प्रेम जितके घट्ट, खरे तितकेच मनात फॉलो फादर करण्याचा उत्साह दिसू लागेल. हे अलौकिक प्रेम

▶ पान क्र. २६ वर

ब्रह्मावत्सांकरिता...

ईश्वरी कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था संपन्न करण्याची आवश्यकता

(भाग - ५)

ब्र.कु.रमेश शाह, मुंबई (गावदेवी).

आपण सारे जाणतो की, हे विश्व-विद्यालय एक प्रशिक्षण केंद्र आहे, जेथे भविष्यातील विश्व-कार्यव्यवहारासाठी निमित्त बनणाऱ्या सौभाग्यशाली बंधु-भगिनींना परमात्माद्वारे शिक्षण मिळत आहे.

या संदर्भात परमात्म्याने सांगितले आहे की, जे विश्व-सेवेसाठी निमित्त बनणारे आहेत त्यांना तीन प्रमाणपत्रे घेणे अगदी आवश्यक आहे - स्वयंपसंत, लोकपसंत आणि प्रभूपसंत! येथे लोक पसंत बनणे खूपच आवश्यक आहे कारण यावेळेस स्वतःमध्ये जे संस्कार भरले जातील त्या आधारावर भविष्यातील कारभार आपल्या हाती असेल. याबाबत असे म्हटले जाईल की, तेथे जे विश्वमहाराजन बनतील ते इतके लोकप्रिय असतील की सारी प्रजा आपल्या राजाला आपल्या कुटुंबातील एक सदस्याच्या रूपामध्ये पाहतील आणि राजासुद्धा आपल्या प्रजेला आपला परिवार समजणारा असेल. तो प्रजेची खूप काळजी घेईल. जसे आपण येथे संगमयुगात म्हणतो की, 'मेरा बाबा, प्यारा बाबा, मीठा बाबा' त्याप्रमाणे सत्ययुगातही प्रजा आपल्या राजासाठी म्हणतील की 'माझा राजा, प्रिय राजा, मीठा राजा'. तेथे राजा आपल्या प्रजेच्या प्रत्येक कार्यात पूर्णरूपाने सहयोगी असेल. द्वापरयुगातही राजा विक्रमादित्याचे वर्णन 'परदुःखभंजन करणारा' असे होते तसेच तो प्रजेची सारी दुःखे दूर करण्यासाठी मदतगार होता. अशाप्रकारे अनेक राजे पूर्वी रात्री वेष पालटून आपल्या राज्यात फेरफटका मारून, आपल्या प्रजेच्या समस्यांची माहिती घेऊन, मग प्रजाहिताची कार्ये करीत असत. अशाप्रकारे प्रजाहिताचे संरक्षण करीत राहिल्याने प्रजा सुख-शांतीने आपले जीवन व्यतित करू शकत होती. यासाठी शास्त्रामध्ये गायन आहे की प्रजा आपल्या राजाला पितासमान मानून त्याचा सन्मान करीत असे.

महाकवी कालिदास यांनी रघुवंश मध्ये रघुवंशाच्या राजाची महिमा करताना म्हटले आहे की राजा आपल्या प्रजेकडून कोणत्याही प्रकारचा कर घेत नसे परंतु प्रजानन आपल्या बचतीतील धन स्वच्छेने राजकोषामध्ये जमा करीत असत व कृषी उत्पन्न राजभांडारामध्ये जमा करीत असत. अशाप्रकारे राजकोष भरभरून वाहत असे. तेव्हा रघुराजा दवंडी देत असे की ज्यांना जेवढे धन हवे तेवढे त्यांनी राजकोषातून घेऊन जावे. सत्ययुगी श्रेष्ठ दुनियेच्या राज्य-कारभाराबाबत असे गायन आहे की तेथील विश्व राज्य-अधिकारी श्रीलक्ष्मी-श्रीनारायण होते, ज्यांची पूजा आजही आपण मंदिरात करीत आहोत. आदर्श राज्यव्यवस्थेमध्ये राजा हा प्रजेमध्ये लोकप्रिय अर्थात लोकपसंत असणे अत्यंत जरूरीचे आहे.

आजच्या काळात दुनियामध्ये निवडणूका होत असतात आणि त्या काही ठिकाणी चार वर्षांनी तर काही ठिकाणी पाच वर्षांनी होत असतात. आज गादीवर कुणी एक असेल तर उद्या त्या जागी कुणी दुसरा असू शकेल आणि त्यामुळे राज्यकारभार नीट होत नाही. निवडणूकीच्या वेळी एका पार्टीचे लोक दुसऱ्या पार्टीच्या लोकांसाठी असभ्य व अशिष्ट शब्दांचा उपयोग करतात आणि कुप्रचार करतात. २५ ते ४० टक्के असे नेते असतात की ज्यांच्यावर कितीतरी कोर्ट केसेस चालू असतात. तेव्हा साधारण व्यक्ती विचारात पडतो की आपले नेते वा राज्यकारभारी असे कसे? जे असभ्य भाषा बोलतात आणि चुकीचे कार्य करतात त्या लोकांना आपण कसे आपले नेते बनविणार? याबाबत मी एक गोष्ट सांगतो. मुंबईत आमच्या सेवाकेंद्रावर एक पोलिस ऑफिसर येत असत. त्यांनी सांगितले की त्यांच्या जेलमध्ये एक नेताजी होते, ज्यांना कोर्टाच्या आदेशानुसार आत ठेवले होते. त्या नेताजीने जेलमधूनच निवडणूक लढवली आणि जिंकून विधायक बनले तेव्हा त्या पोलिस ऑफिसरची फार पंचाईत झाली. कालपर्यंत जो आमच्या जेलमध्ये राहून आम्हाला सलाम करीत होता, त्यांना आज आम्हाला सलाम करावा लागतो, ही वर्तमानकाळातील विडंबना आहे.

सत्ययुगी दुनियेतील कारभारात असा प्रकार होणार नाही, हे समजण्यासाठी आपल्याला परमात्म्याचा समाजवाद समजून घ्यावा लागेल. आजच्या दुनियेत वेळोवेळी निवडणूका होतात आणि ज्याला बहुमत प्राप्त होते तो राज्य करतो. परमात्म्याच्या निवडणूकीचा कारभार संगमयुगावर होतो. इथे परमात्मा सर्वांना एक समान ईश्वरी ज्ञान देतात, राजयोग शिकवितात आणि म्हणतात की तुम्ही तुमच्या पुरुषार्थाच्या आधारावर स्वतःच स्वतःचे भाग्य विधाता बना, मी नाही तुमचे भाग्य बनवित. तुमचे भाग्य ना कुणी बनवू शकतो अन् ना ही बिघडवू शकतो म्हणजेच शिवबाबा सर्वांना भविष्यातील श्रेष्ठ पदाच्या प्राप्तीची लॉटरी देतात. **संगमयुग एक असे निवडणूकीचे क्षेत्र आहे की, जेथे आपण आपल्या पुरुषार्थाच्या आधारावर भविष्य राज्य अधिकारी बनतो. म्हणून शिवबाबा म्हणतात की, 'जो करेगा, सो पायेगा।'** आम्हा सर्व ब्रह्मावत्सांना हे ज्ञान शिवबाबांनी दिले असतानाही आपण दैनंदिन जीवनातील समस्यांमध्ये इतके गढून जातो की भविष्यासाठी आपल्याला श्रेष्ठ भाग्य बनविणे शक्य होत नाही. एकदा साकार ब्रह्मा बाबांनी आपल्या सर्व मुलांना असा संदेश दिला की, 'मुलांनो जर तुमच्याकडे तुमच्या परिवाराचे पालनपोषण करण्याइतके पर्याप्त धन असेल तर अधिक धनप्राप्तीसाठी विशेष मेहनत न करता, ईश्वरी सेवेत लागून आपले भविष्य श्रेष्ठ भाग्य निर्माण करण्याची मेहनत करा.'

एकदा मी मधुबनमध्ये असताना ब्रह्माबाबा म्हणाले, 'मला जर कुणी विचारले की आज जर माझे शरीर सुटले तर मी काय पद प्राप्त करील तर ते मी सांगू शकेन.' यावर मी बाबांना म्हटले की बाबा, मग आज तर तुमच्याजवळ मोठी लाईन लागेल. तेव्हा बाबा म्हणाले, 'नाही बेटा, बाबाजवळ कुणीही येणार नाही कारण प्रत्येक जण आपला वर्तमान पुरुषार्थ आणि स्थितीअनुसार आपले काय पद असू शकेल ते जाणत असतो. प्रत्येक जण आपल्या स्वभाव-संस्काराच्या बंधनात किंवा अन्य दुसरे कोणते न कोणते असे काही बंधन असते की नाईलाजाने त्यासह चालत असल्याने इच्छा असूनही भविष्यातील श्रेष्ठ पद प्राप्त करू शकत नाही. अंतिम काळात प्रत्येकाला जाणीव होईल की, संगमयुगावर मला इतकी श्रेष्ठ संधी मिळाली होती परंतु पुरुषार्थ न केल्यामुळे श्रेष्ठ पदाची प्राप्ती होऊ शकली नाही आणि या कारणामुळेच सत्ययुगातील राजाच्या विषयी प्रजेच्या मनात ईर्ष्या वा द्वेषाची भावना नसेल उलट राजा आणि प्रजा यांच्यात आपसात सन्मानाची भावना असेल.

ही आपसातील सन्मानाची भावना आणि समानतेची भावना आपले प्रिय ब्रह्माबाबा, प्रिय मातेश्वरी आणि दादी प्रकाशमणीजी यांनी आम्हा सर्वांमध्ये निर्माण केली, ज्यामुळे या विश्व-विद्यालयाने आज सुमारे ७८ वर्षे पूर्ण केली. एकदा मी ज्ञानामृतामध्ये एक गंमतीने गोष्ट सांगितली होती की जर समजा आपल्या येथे निवडणूक झाली व त्यामध्ये एका बाजूला दादी प्रकाशमणीजी आणि दुसऱ्या बाजूने मी उभा राहिलो तर सर्वांची मते दादी प्रकाशमणीजींना जातील, अगदी माझेसुद्धा! आजच्या कम्युनिस्ट देशांमध्ये केवळ एकच प्रतिनिधी उभा राहतो आणि सर्व त्या एका प्रतिनिधीला आपले मत देतात व घोषित करतात की तो प्रतिनिधी बिनविरोध निवडून आला परंतु बाबाच्या यज्ञात असे होत नाही. दादी प्रकाशमणीजी जर शंभर टक्के मतांनी बिनविरोध निवडून आल्या तर त्याचा अर्थ असा आहे की लोकांनी दादीजींची लोकप्रियता आणि गुणांच्या आधारे स्वखुशीने त्यांना मत दिलेले आहे. **ही गोष्ट हे सिद्ध करते की आपले श्रेष्ठ भविष्य आजच्या वर्तमानावर आधारीत असते. तात्पर्य म्हणजे आपले बाबा, मम्मा आणि दादी इतके लोकपसंत आहेत की आपणच आपोआप त्यांच्या हाती आपल्या भविष्याचा राज्यकारभार सोपवून देऊ.**

अशाप्रकारे विश्वाच्या राज्यकारभारासाठी जे कुणी निमित्त बनतील त्यांच्यामध्ये एक वैशिष्ट्य असते, ज्याला मॅनेजमेंट गुरू लोक रचनात्मक असणे असे संबोधितात, म्हणजे ते आपल्या समवेत असलेल्यांना सतत काही ना काही रचनात्मक कार्यात मग्न ठेवतात. अशी माणसे सदैव आपल्या समवेत असलेल्या व्यक्तींच्या उत्कर्षासाठी प्रयत्नशील राहतात अन् कारभार पुढे चालवीत नेतात. फलस्वरूप त्यांचा कार्यव्यवहार इतक्या सुंदररितीने चालतो की त्यांचे सहकारीही कधीच आळस वा चालढकलपणा करीत नाहीत. दुःखाच्या काळातही त्यांचे वागणे असे असते की समोरच्या व्यक्तीच्या

मनात दुःखाची भावना येत नाही. मातेश्वरींनी ज्यावेळेस आपल्या शरीराचा त्याग केला होता तेव्हा आम्ही त्यांच्या पार्थिव शरीरावर अंतिम संस्कार करून परतल्यावर ब्रह्माबाबांना भेटलो. आमचे शोकमग्न चेहरे पाहून बाबांनी आम्हाला विचारले, 'मुलांनो, तुम्ही काय शोक व्यक्त करायला आला आहात की काय ? तुमची मम्मा तर श्रीलक्ष्मी बनण्याचा श्रेष्ठ पुरुषार्थ करून, श्रेष्ठ पदाची अधिकारी बनून गेली मग तुम्ही त्यांच्यासाठी का शोक करतां ?' नंतर बाबांनी हवाईमहल जेथे पाहुणे होते, तो खाली करून तेथे आलेल्या टीचर्स भगिनींसाठी त्रिदिवसीय राजयोग शिबीराचे आयोजन केले त्यामुळे त्यांचा शोक दूर झाला. अशाप्रकारे बाबांनी सेवेच्या नवनवीन पद्धतींद्वारे मुलांना विविध प्रकारच्या सेवेसाठी निमित्त बनविले. बाबा नेहमी मुलांना वेगवेगळ्या नवीन सेवांमध्ये व्यस्त ठेऊन त्यांच्यामध्ये उत्साह आणि उमंग भरीत असत.

नोव्हेंबर १९६८ मध्ये मधुबनमध्ये प्रिय ब्रह्माबाबांच्या मार्गदर्शनाखाली वर्ल्ड रिन्युअल स्पिरीच्युअल ट्रस्ट बनविण्याचे ठरले तेव्हा त्याचा समाचार मी भ्राता ब्र.कु. जगदीशजी यांना लिहित होतो. त्यावेळी तेथे बाबा पोहचले आणि त्यांनी मला विचारले, 'मुला काय करीत आहेस ?' मी म्हणालो, 'बाबा, वर्ल्ड रिन्युअल स्पिरिच्युअल ट्रस्ट करण्याबाबतचा समाचार मी आदरणीय भ्राता जगदीशजी यांना लिहित आहे.' त्यावर बाबा म्हणाले, 'राहू दे मुला. बाबा स्वतःच त्यांना माहिती देतील. तुम्ही मुंबईला जाऊन ट्रस्टचे नोंदणीकरण करण्याचे कार्यव्यवहार करा.' बाबांच्या श्रीमतानुसार आदरणीय दादी प्रकाशमणीजी व मी मुंबईला गेलो. हा कार्यव्यवहार जेव्हा चालू होता तेव्हा बाबा रोज याबाबत आम्हाला मार्गदर्शन देत असत व आम्ही त्या अनुसारच ट्रस्टचे संचालन करीत राहिलो. याप्रकारे दिनांक १६ जानेवारी १९६९ ला वर्ल्ड रिन्युअल स्पिरिच्युअल ट्रस्ट नोंदणीकृत झाला. नंतर बाबांनी मला अहमदाबादला पाठविले आणि म्हणाले, नखी लेकजवळ असलेल्या बुँदी कॉटेजची विक्री होत आहे, तर तुम्ही अहमदाबादला जाऊन त्याचा सौदा करा. अहमदाबादला जाऊन मी बाबांना माहिती दिली की या घराच्या कार्यव्यवहाराचे काम ९५% झाले आहे व फक्त आता अर्धा तासाचे काम राहिले आहे. परंतु घरमालक म्हणतो की घराची नोंदणी ७-८ दिवसानंतरच करू. त्यामुळे बाबांना विचारले की मी मधुबनला येऊ की बडोद्याला नवीन प्रदर्शनीचे कार्य चालले आहे तेथे जाऊ ? त्यावर बाबा म्हणाले की तुम्ही बडोद्याला जा. परंतु दादी प्रकाशमणीजीने मला माउंट आबूला येण्याचे निमंत्रण दिले. मी १९ जानेवारीला सकाळी १० वाजता मधुबनला पोहचलो. बाबा अव्यक्त झाल्यावर मधुबनमध्ये येणारा मी पहिला भाई होतो. मग बाबांच्या अंतिम संस्कारासाठी मी निमित्त बनलो.

अशाप्रकारे बाबा ईश्वरी सेवेत सदैव स्वतः तर तत्पर राहिलेच पण इतरांमध्येही उमंग-उत्साह भरत राहिले. सत्ययुगातील राजेसुद्धा आपल्या प्रजेला कोणत्या ना कोणत्या रचनात्मक कार्यात मग्न ठेऊन, अनेक प्रकारच्या प्रेरणा त्यांना देत राहतील. अशाप्रकारे प्रजा ही आपले जीवन आनंदाने व्यतित करीत राहिल. आपल्या प्रजेला रचनात्मक गोष्टींमध्ये व्यस्त ठेवण्याची जबाबदारी राजाची असेल आणि भविष्यासाठी हे संस्कार आपल्याला या संगमयुगीच धारण करायचे आहेत. आताच्या काळात नवीन-नवीन नियम बनविले जातात, पंचवार्षिक योजना बनविल्या जातात ज्या पूर्णपणे राबविल्या जात नाहीत. **सत्ययुगात नवीन नवीन कायदे तर नसतील पण नवनवीन कार्यक्रम मात्र बनत राहतील ज्यामुळे सर्वांचे जीवन उल्हसित राहील. अशाप्रकारे भविष्य राज्यकारभार करणारे लोकपसंत तर हवेतच पण रचनात्मक कार्य करणारे ही हवेत तसेच सर्वांच्या जीवनात उमंग-उत्साह आणणारे देखील हवेत.**

(भावानुवाद : ब्र. कु. जयश्री, विक्रोळी-मुंबई)

शुभ भावनेचे बोल, हिरे-मोती समान

आपण महान आत्मे आहोत. त्यामुळे आपले बोल मधुर असले पाहिजेत. तसेच प्रत्येक आत्म्यासाठी शुभ-भावना संपन्न असले पाहिजेत. आपले बोल कधीही साधारण नसावेत. कोणीही अचानक जरी आला तरी त्याला असा अनुभव आला पाहिजे की हे बोल नसून मोती आहेत. शुभभावनेचे बोल सदैव हिरे-मोती समान असतात. अशाप्रकारचे आपले बोल आहेत का, हे चेक करा.

त्वमेव माताच पिता त्वमेव

(भाग - १)

ब्र.कु.हेमंतभाई, शांतिवन-आबू रोड.

संबंध हा सुखी जीवनाचा आधार आणि संपूर्ण व्यक्तिमत्वाचा सुरेख अलंकार आहे. खरोखरच संबंध म्हणजे भाव-भावनांच्या ओलाव्याने भिजलेलं, हृदयात प्रेमाने जपलेलं, स्नेहाच्या सोनेरी सौंदर्याने सजलेलं, मानव जीवनाचे लेणंच नाही का? वास्तविक संबंधाशिवाय मानव जीवनाची कल्पना करणेच अशक्य आहे. जसा मासा पाण्याविना जिवंत राहू शकत नाही तसे संबंधांशिवाय जीवनात जिवंतपणा नाही. मानव हा कुटुंबात राहणारा, परिवारात वाढणारा, समाजात वावरणारा सामाजिक प्राणी आहे. संबंधांच्या रेशमी धाग्यांनी भावनांची देवाण-घेवाण करण्याचा, नात्यांना जीवापाड जपण्याचा त्याचा स्वभाव आहे. जसे हृदयात रक्ताचे महत्व तसेच सुखी, समाधानी स्वस्थ जीवनात मधुर, मजबूत, घनिष्ठ संबंधांचे महत्व आहे. संबंध वा नाती, मग ती रक्ताची असोत वा जीवनयात्रेत बनवलेली (शिक्षक, गुरु, मित्र इ. संबंध) असोत; आपलेपणाचा स्वाद देणारे संबंध, स्वार्थरहित प्रेम लुटणारे संबंध, जीवनाला खरा अर्थ देतात. म्हणूनच तृप्तीचा आनंद देणारे, मनाला समाधान देणारे संबंध प्रत्येकाला हवे-हवेसे वाटतात. सुख-दुःखाच्या वेळी साथ देणारे दोन-चार जीवलग सोबत नसतील तर आयुष्य कंटाळवाणे वाटेल. पण प्रेमाची उधळण करणारे, वेळ प्रसंगाला धावून येणारे, जीवाभावाचे सगेसोयरे असले तर जीवनाचा प्रवास आनंदाने कधी संपतो, हे कळतही नाही.

जन्मदात्री आईच्या कुशीत आयुष्याची सुंदर पहाट होते. मातेच्या ममतामयी वात्सल्याचा स्पर्श, संगोपनासोबत अमृताची अवीट गोडी देतो. पित्याचे प्रेम छत्रछाया बनून रक्षण तर करतेच, त्यासोबत वारस हक्क देऊन पिता आपल्या बालकाला तन-मन-धनाने समर्थ बनवतो. शिक्षकाची शिकवण (शिक्षण) जीवनाच्या वेड्यावाकड्या वळणावर चालायला शिकवते व उच्च पदाच्या शिखरावर पोहचवते. आयुष्यात अचानक आपत्ती आली तर भाऊ मदतीला धाऊन येतो. जे आपण दुसऱ्यांना सांगू शकत नाही, असं मनातलं जिव्हाळ्याच्या मित्राला सांगतो. परिणामतः मनावर असलेलं ओझं हलक होतं. पति (किंवा पत्नी) जीवनाच्या गाडीचं चाक बनून, सुख-समृद्धीला गती देतो. पतिरूपाने सौभाग्याचा शृंगार प्राप्त होतो तर पत्नीच्या रूपात साथी, सांगाती मिळते. गुरु बुद्धीरूपी हातात ज्ञानाचा दीप देऊन, विवेकाच्या उजेडात, सत्कर्माच्या वाटेवर चालण्याचा मंत्र कानात फुंकतो. जेव्हा आयुष्याची सांज होते तेव्हा थकलेल्या तनाला व उदास मनाला पुत्र आधार देतो. शेवटी नानाविध नात्यांच्या गोड चवी चाखत, मानव जगाचा निरोप घेतो.

असे हे सर्व संबंधांचे सुख कोणी विरळाच प्राप्त करतो. तो खरोखरच भाग्यवान होय. प्रत्येक जण मातापित्याच्या पोटी जन्माला येतो. माता, पिता, बंधु, सखा, स्वामी, पुत्र, शिक्षक, गुरु या संबंधांद्वारे सुखाची कामना बाळगतो, त्या सुखासाठी झटतो. सुंदर अशी नात्यागोत्यांची गुंफण विणतो आणि अल्पकाळ सुख प्राप्त करण्यात सफल देखील होतो. **परंतु हे संबंधांचे सुख सध्याच्या या स्वार्थी जगात किती काळ टिकते, हे आपण जाणतोच. स्वार्थ संपला की आपलाही परका होतो. कामापुरता मामा आणि ताकापुरती आजी, ही आजच्या जगाची रीत आहे. चहुकडे देवाण-घेवाणीत स्वार्थ भरून उरलेला दिसतो.** जेथे नातेवाईकांच्या बुद्धीत संकीर्णता, भाव-भावनेत मलीनता, हृदयात उदारतेची कमतरता दिसते तेथे निःस्वार्थ, अमर्याद, संबंध-सुखाची अपेक्षा करणं कितपत योग्य आहे?

ग्रीष्माचा कडक उन्हाळा सुरू झाला की नद्या-तलावांची पात्रं कोरडी पडतात. विहिरी आटू लागतात. तेव्हा माणूस असो वा पशू-पक्षी, सर्वच थेंबभर पाण्यासाठी व्याकुळ होऊन आकाशाकडे डोळे लावतात. जोपर्यंत वरुणराजा प्रसन्न होत नाही, धो-धो पाऊस पडत नाही, नद्या-नाल्यांना उधाण येत नाही, नद्या-विहिरी काठोकाठ भरत नाहीत तोपर्यंत शेतं हिरवी होऊन अन्नधान्य ही पिकत नाही. म्हणजे जोपर्यंत जल-जन्मदाता सागर, मेघरूपात पावसाच्या सरी बनून, दारी येत नाही तोपर्यंत अन्न-पाण्याच्या समस्येचे

कायमस्वरूपी समाधान होत नाही. तात्पर्य म्हणजे साऱ्या जगाच्या जलपूर्तीचे कार्य फक्त सागरच करू शकतो. त्याप्रमाणेच सांप्रत कलियुगाचा काळ हा ग्रीष्म ऋतुप्रमाणे आहे. येथे कोणीही व्यक्ती, दुसऱ्या व्यक्तीला सदा सर्व संबंधांचे सुख देऊ शकत नाही जेव्हा देहधाऱ्यांकडून संबंधांचे सुख मिळत नाही तेव्हा मानव मन ईश्वराकडेच धाव घेते.

ईश्वर कधीही न सुकणारा, न आटणारा प्रेम व सुखाचा सागर आहे. त्याच्यापासून मिळणारे सुख कधी सरत नाही. तोच सर्व संबंधांचे सुख देणारा महासागर आहे. त्याच्या तुलनेत देवात्मे, धर्मात्मे, महात्मे वा पुण्यात्मे म्हणजे प्रेमाच्या सरिता व सरोवर आहेत. त्यांचे प्रेम उन्हाळ्यात आटणाऱ्या विहिरी वा सुकणाऱ्या नद्यांप्रमाणे संपू शकते कारण हे सर्व देहधारी व्यक्तीच आहेत. परंतु परमात्मा शिव हा निराकार, विदेही व अशरीरी असल्याने, सागराप्रमाणे अमर्याद प्रेम लुटू शकतो. तोच जगाचा मालक तसेच पालक असून सर्व संबंध जोडण्यासाठी सर्वथा योग्य आहे. म्हणून गायन केले जाते -

त्वमेव माताच पिता त्वमेव। त्वमेव बन्धुश्च सखा त्वमेव।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव। त्वमेव सर्वं मम देवदेव।।

(भावार्थ : हे परमेश्वरा, तूच माझी आई, तूच माझा पिता, भाऊ आणि मित्र आहेस. तूच विद्या, धन आणि माझे सर्वस्व आहेस.)

परमात्मा म्हणजे साक्षात जीवनाच माधुर्य! परमात्मा म्हणजे अमृतस्वरूप जीवनरस! परमात्मा म्हणजे निर्मळ चैतन्य! हृदयमंदिर प्रकाशित करणारे देवाधिदेव! अतींद्रिय सुख देणारा कैवल्यधाम! म्हणूनच भक्तांनी प्रेमसागर प्रभूशी वेगवेगळे संबंध जोडले. रामकृष्ण परमहंसांनी परमेश्वराशी जगत्जननी मातेच्या रूपात मनाचं नातं जोडलं व भावमय भक्तिरसात तल्लीन होऊन आईच्या (महाकाली रूपात) उत्कट ममतामयी वात्सल्याची चव चाखली. संत जनाबाईने भगवंतास पितारूपात पाहिले व विठ्ठलाची लाडकी लेक बनून, पितृप्रेमाचा आनंद लुटला. सुदाम्याने सखा बनवून त्याच्याशी हृदयाचं रेशमी नातं गुंफलं. कर्माच्या गुह्यगतीचे ज्ञान देणाऱ्या ज्ञानेश्वरासाठी भगवंत परमशिक्षकच नव्हता का? अर्जुनासाठी युद्ध भूमीत ज्ञान देणारा सत्गुरु होता. संत शिरोमणी मीराबाईने श्रीकृष्णाला आपला प्रियतम बनवला. लाज लुटली जात असताना द्रौपदीने श्रीकृष्णाला बंधु रूपात पुकारले तेव्हा मदतीला धावत येऊन तिच्या शीलाची रक्षा केली. माता यशोदेने बाळकृष्णाला पुत्र रूपात प्राप्त करून पुत्रप्रेमाचा रस घेतला. संत-सज्जनांनी देवी-देवतांच्या साकार मूर्तीला ईश्वराचं रूप मानलं तरी त्यांनी मनात ईश्वर भक्तीचा भाव ठेवूनच देवी-देवतांशी नातं जोडलं. वास्तविक देवी-देवता हे देहधारीच होते पण भक्तांनी त्यांना ईश्वराच्या दृष्टीने पाहिले.

भक्तिमार्गात भावनेला प्राधान्य असते, 'जैसी रही भावना जाकी, प्रभू मूरत देखी उन जैसी' या म्हणीप्रमाणे ज्या रूपात ईश्वराला भेटायची इच्छा भक्तांनी बाळगली, त्या त्या संबंधाच्या रूपाने त्यांनी अनुभव केला. परमात्मा हा निराकार, अशरीरी, विदेही आहे. म्हणून भक्तांनी ईश्वरी रचना देवी-देवतांच्या (महाकाली, श्रीकृष्ण, विठ्ठल यांच्या) दैहिकरूपात ईश्वराचं अस्तित्व मानलं. परमात्म्याशी संबंध प्रस्थापित केला व समर्पण भावनेच्या जोरावर त्या संबंधाचे सुख लुटले. म्हणूनच देवाच्या दारी जाताना भक्तगण सर्व संबंधांचे परमात्म-स्वरूप ध्यानी मनी ठेवतात. ईश्वराचे त्या स्नेहरूपात स्मरण, वंदन, पूजन करतात. त्या संबंधाच्या सुखाने भावविभोर होतात. त्यांच्या **नवधा** भक्तीने प्रसन्न होऊन परमात्मा त्यांची मनोकामनाही पूर्ण करतो. अशा-प्रकारची भक्ती आपण मागील ६३ जन्मांपासून करीत आलो. त्या भक्तीचे फळ म्हणून सत्य ज्ञान देण्यासाठी, परमात्मा शिव पित्याचे दिव्य अवतरण आता झाले आहे. याचेच प्रतीक म्हणून भारतवासी शिवजयंती (महाशिवरात्री) मोठ्या उत्साहाने साजरी करतात. **या अनुषंगाने स्वयं शिव परमात्म्याने ब्रह्मामुखाद्वारे उच्चारण केलेली पुढील महा-वाक्ये बोधप्रद आहेत, 'मीठे बच्चे, उँच ते उँच तो है भगवान। शिवजयन्ति भी मनाते है। जो जरूर उसका अवतरण हुआ है। अवतरण एक बापका होता है और बाप का अवतरण होता भी भारत में है। परंतु भारतवासी भूल गये है। भक्त कहते भी है कि हम परमपिता परमात्मा की पूजा करते है परंतु वह कब आया, क्या किया? कुछ भी जानते नही।'**

▶ पान क्र. १४ वर

अमृतवेला

ब्र.कु.पद्मा, सायन - मुंबई.

सहज पुरुषार्थ आणि सहज प्राप्तीसाठी सर्वात उत्तम वेळ अमृतवेला आहे. अमृतवेलेस आपल्या आत्म्याला अमृताने भरपूर केल्याने साऱ्या दिवसभर कर्मेही अशीच श्रेष्ठ होतील. वेला जशी श्रेष्ठ, अमृत श्रेष्ठ तसेच प्रत्येक कर्म आणि संकल्पसुद्धा सारा दिवस श्रेष्ठ होईल. जर ही श्रेष्ठ वेला साधारणरित्या घालवाल तर सारा दिवस संकल्प व कर्मेही साधारणच होत राहतील. तेव्हा असे समजावयास हवे की ही अमृतवेला साऱ्या दिवसाच्या समयाची आधार वेला आहे. जर आधार कमजोर वा साधारण बनवाल तर वरची रचनाही (बनावट) आपोआप अशीच होईल. त्यामुळे आधाराकडे जसे सदैव लक्ष दिले जाते तसेच दिवसाचा आधार काळ (फाउंडेशन टाइम) अमृतवेला आहे.

अमृतवेलेचे महत्व समजून वागाल तर कर्मेसुद्धा महान वा श्रेष्ठ होतील याला ब्रह्म-मुहूर्त ही म्हणतात. ब्रह्म-मुहूर्त आहे वा ब्रह्मा-मुहूर्त आहे? ब्रह्मा-मुहूर्तही बरोबर आहे कारण सर्वजण प्रजापिता ब्रह्मा यांच्या समान नव्या दिवसाचा आरंभ करीत असतात. तेसुद्धा बरोबरच आहे. पण ब्रह्म-मुहूर्ताचा अर्थ तरी काय आहे? त्यावेळेचे वातावरण असे असते की त्यामुळे आत्मा सहजच ब्रह्मनिवासी होण्याचा अनुभव करू शकतो. इतर वेळी आपण पुरुषार्थ करून आवाजापासून, वातावरणापासून स्वतःला अलग (डिटॅच) करतो, मेहनत करतो पण त्यावेळी या मेहनतीची आवश्यकता नसते. जसे ब्रह्म-घर हे शांतिधाम आहे, तसेच अमृतवेलेस-सुद्धा आपोआप शांती असते. शांतीमुळे शांत स्वरूपाची स्थिती (स्टेज) किंवा शांतिधाम निवासी होण्याची स्थिती सहजच धारण करू शकतो. तेव्हा जे श्रीमत मिळालेले आहे, ते ब्रह्म-मुहुर्ताच्या वेळी स्मृतीत आणाल तर ब्रह्म-मुहूर्त किंवा अमृतवेलेस श्रेष्ठ स्थिती सहज अनुभवाला येईल. पहा, विद्याभ्यास (पढाई) करणारेही अभ्यास लक्षात ठेवण्यासाठी याचवेळी अभ्यास करण्याचा प्रयत्न करतात कारण याचवेळी सहज स्मृती राहते. तेव्हा आपली स्मृती सामर्थ्यशाली करावयाची असेल किंवा स्मृतीस्वरूप व्हावयाचे असेल तर अमृतवेलेच्या मदतीने सहजच स्मृती सामर्थ्यशाली करू शकता. अमृत वेळेच महत्व फार आहे, इतके महत्व तुम्ही या वेळेस देता किंवा कधी देता कधी देत नाहीत? वास्तविक अमृतवेळेला योगाभ्यास करणे ही पुरुषार्थाची फार सोपी युक्ती आहे. फक्त या युक्तीस इतके महत्व द्यावयास हवे. जसे श्रीमत आहे त्यानुसार वेळ ओळखून व समयानुसार कर्तव्य केले तर सर्व प्राप्ती करू शकाल. मग मेहनतीपासून मुक्त व्हाल. मुक्त होऊ इच्छित असाल तर त्यासाठी जे साधन आहे ते आत्मसात करा. तसेच रोज अमृतवेळेला एक स्वमान घ्या व दिवसभर त्या स्वमानाच्या नशेत राहा म्हणजे देह व देहाच्या दुनियेचा विसर पडेल. त्याचबरोबर अव्यक्त वतन आणि मूळ वतनमध्ये लवलीन रहाता येईल, अतींद्रिय सुख अनुभवाला येईल. उदाहरणार्थ, 'मी ब्राह्मण आत्मा रचयिता परमात्म्याची सर्वश्रेष्ठ रचना आहे.' अर्थात त्या रचनाकाराची मी सर्वश्रेष्ठ रचना आहे. माझ्यापेक्षा श्रेष्ठ रचना कुठलीच नाही म्हणजे मी किती श्रेष्ठ वा उच्च आहे. (विभिन्न स्वमानासाठी वाचकांनी 'वाह रे मैं ब्राह्मण आत्मा' हे पुस्तक अवश्य वाचावे.) दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे अमृतवेळेचा योग चांगला होण्या-साठी, रात्री झोपण्यापूर्वी अर्धा तास शिवबाबांची आठवण अवश्य करा. स्वदर्शन चक्र फिरवा म्हणजे सकाळी उठल्यानंतर देखील तीच स्मृती राहिल. अमृतवेळेला विशेष बीजरूप स्थितीचा अभ्यास करा म्हणजे दिवसभर श्रेष्ठ स्थितीचा अनुभव येत राहिल. ❖❖❖

▶ पान क्र. १३ वरून

तात्पर्य म्हणजे महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर शिव परमात्म्याचा सत्य परिचय प्राप्त करून घ्या. त्यासाठी ब्रह्माकुमारीज् संस्थेच्या सेवाकेंद्राला अवश्य भेट द्या. तसेच एक शिव परमात्म्याशी सर्व संबंध जोडून, सर्व सुखाचा अनुभव करा. त्यासाठी देहसहित देहाच्या सर्व संबंधांना विसरून, स्वतःला आत्मा समजा व एक शिव परमात्म्याला (शिवबाबांना) आपला सर्व संबंधी बनवा म्हणजे आपले जीवन धन्य-धन्य होईल. *(क्रमशः)*

सावंतवाडी : येथील जिल्हा कारागृहात ईश्वरी संदेश दिल्यानंतर ग्रुप फोटोत जेल अधीक्षक श्री.कांबळे, ब्र.कु. भगवान भाई (शांतिवन), ब्र.कु. स्नेहा बहेन व पोलिस अधिकारी.

मडगाव (गोवा) : आमदार विजय सरनाईक यांच्या पत्नी श्रीमती उषा सरदेसाई यांना ईश्वरी सौगात देतांना ब्र.कु. शोभा बहेन, सोबत ब्र.कु.राखी व नुतन बहेन

मलकापुर (शाहूवाडी) : 'युवा देशाचा आधार स्तंभ' या विषयावर बोलतांना ब्र.कु. वंदना बहेन तसेच लक्षपूर्वक ऐकतांना युवावर्ग.

भंडारा : ७ अरब सत्कर्मांची महायोजनेच्या उद्घाटन प्रसंगी पोलिस निरीक्षक श्री. हेमंत चांदेवार, डॉ. गिरपुंजे, श्री. रोंधे सर, ब्र.कु. शांता दीदी, ब्र.कु. शोभा, सुशिल व ज्योती बहेन

डोंबिवली : सेवाकेंद्राद्वारे आयोजित सुस्वास्थ प्रदर्शनी आणि मोफत चिकित्सा या कार्यक्रमाचे उद्घाटन करताना ब्र.कु. शकू दीदी, डॉ.अग्रवाल, डॉ. चंपा, श्री. विसपूते व श्री. केशव भोईर

अंबरनाथ : चॉकलेट कंपनीचे मॅनेजर भ्राता कुलविंदर सिंग यांना ईश्वरी संदेश देतांना ब्र.कु.दत्तात्रय भाई (शांतिवन) सोबत ब्र.कु. तनुजा बहेन व अन्य.

रोहा : पोलिस इन्स्पेक्टर श्री. भागवत यांना ईश्वरी संदेश देतांना बी.के. पूनम दीदी.

मालाड : येथील बेस्टच्या कंडक्टर्स व ड्रायव्हर्ससाठी आयोजित आध्यात्मिक कार्यक्रमात सहभागी स्टाफ व अधिकारी

हिंगोली : विधायक डॉ. जयप्रकाश मुंदडा व डी.वाय.एस. पी. सुनिल लांजेकर यांच्याशी ज्ञानचर्चा करतांना ब्र.कु. अरूणा बहेन, शेजारी वैजनाथ भाई व अन्य मान्यवर

जयसिंगपूर : येथील भारत बँक मधील स्टाफसाठी 'सेल्फ मॅनेजमेंट लिडरशीप' कोर्स केल्यानंतर स्टाफ सोबत ब्र.कु. निवेदिता व राणी बहेन

पंढरपूर : विश्व शांती गुरुकुलच्या वार्षिक महोत्सवानिमित्त दीप प्रज्वलित करतांना ब्र.कु. सोमप्रभा दीदी, ब्र.कु. उज्वला व संगीता बहेन, संगीतकार आम्माजी बहेन, श्री. प्रसाद सर, श्री. पराड सर

बार्शी : हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना ब्र.कु. संगीता बहेन, शेजारी मुख्याध्यापिका खोगरे, अनिता बहेन व शाळेचे संचालक ब्र.कु. मोहन भाई.

चिपळूण : संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी व सुप्रसिद्ध कवी संदीप खरे याना ईश्वरी संदेश देतांना ब्र.कु. शिल्पा बहेन व जयश्री बहेन.

मडगांव (गोवा) : सुप्रसिद्ध किर्तनकार चंद्रहास बुवा जोशी यांना ईश्वरी सौगात देतांना ब्र.कु. शोभा बहेन सोबत उषा सरदेसाई, डॉ. नागवेकर, ब्र.कु. राखी व नूतन बहेन.

पाचोरा : सेवाकेंद्राद्वारे आयोजित सन्मान समारंभात भाषण करतांना ब्र.कु. भास्कर भाई, मंचासीन ब्र.कु. मीरा बहेन, चंद्रा बहेन, इंदिरा दीदी व अन्य.

अलिबाग : मुरूड जंजिरा येथील हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. उदय गद्रे यांना ईश्वरी संदेश दिल्यानंतर भेटवस्तू देतांना ब्र.कु. भारती दीदी.

कोंढा (नांदेड) : येथील गीता पाठशाळेचे उद्घाटनप्रसंगी ब्र.कु. स्वाती दीदी, ब्र.कु. दत्तात्रय भाई (शांतिवन), सरपंच बालाजी पाटील, श्री. बाबुराव कदम व श्री. माधवराव पाटील.

वाशी (नवी मुंबई) : इंदिरा गांधी इंजिनिअरींग कॉलेजचे मॅनेजिंग ट्रस्टी भ्राता सुनिल जाधव यांना ईश्वरी भेटवस्तू देतांना ब्र.कु. शीला दीदी शेजारी टिळक कॉलेजच्या प्राचार्या गुरुमीत कौर.

संगमनेर : (मालदाड रोड) विज्ञान प्रदर्शनात आदर्श गावाच्या मॉडेलचे उद्घाटन करतांना उपसभापती सौ. मीराताई ढोले, ब्र.कु.अनिता बहेन व जि.प. सदस्या सौ. पद्माताई थोरात

मडगांव (गोवा) : सुप्रसिद्ध चित्रकार श्री. सुनिल नाईक यांना ईश्वरी संदेश दिल्यानंतर भेटवस्तू देतांना ब्र.कु. सुरेखा बहेन.

बलसाड : '७ अरब सत्कर्मांची महायोजना' या कार्यक्रमाचे उद्घाटन करतांना सांसद डॉ. पटेल, विधायक श्री. देसाई, मेयर सोनलबेन, ब्र.कु. रोहित भाई, ब्र.कु. रंजन बहेन, विधायक श्री. भरत पटेल व अन्य.

शिरोळ (कोल्हापूर) : येथील हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना 'नैतिक शिक्षण' या विषयावर मार्गदर्शन केल्यानंतर ब्र.कु. बालूभाई (शांतिवन) यांचे आभार व्यक्त करतांना शाळेचे मुख्याध्यापक.

पुणे (निगडी) : येथील महाविद्यालयातील विद्यार्थिनींना निर्भयता या विषयावर मार्गदर्शन केल्यानंतर ग्रुप फोटोत ब्र.कु. स्मिता, ब्र.कु. संगीता आणि विद्यार्थिनी.

अहमदनगर : ब्रह्माकुमारीज् संस्थेच्या विविध गतिविधींची ऑन लाइन माहिती करून घेतांना, समाजसेवक श्री. आण्णा हजारे, शेजारी ब्र.कु. राजेश्वरी, ब्र.कु. दीपक भाई, ब्र.कु. रामचंद्र हीरे व डॉ. बापूसाहेब कांडेकर

ब्रह्मावत्सांकरिता...

आपल्या संपन्न आत्मस्थितीला तडा देणारा खतरनाक मनोविकार - मोह

ब्र.कु. जगदीश दीक्षित, पुणे.

प्रदीर्घ काळ पुरुषार्थ करून पाच मनोविकारांना आपण पूर्णतः जिंकले असे वाटत असतानाच अशी काही परिस्थिती जीवनात निर्माण होते की ज्या परिस्थितीमुळे साधकाच्या बुद्धीचा हा निर्णय होतो की, अद्याप आपण मोहाला जिंकलेले नाही. या मोहाचा आरंभ होतो तो स्वतःच्या देहापासून. जोपर्यंत देहाला कोणतीही व्याधी होत नाही तोपर्यंत स्वतःच्या देहात किती मोह आहे याची परीक्षा होत नाही. अनेक वर्ष निर्विघ्न पुरुषार्थ करणारे ब्रह्मावत्स आपल्या वृद्धावस्थेत काही व्याधी झाल्यावर या व्याधीत इतके व्यस्त होतात की त्यांना सेंटरवर येऊन मुरली ऐकण्यासही वेळ मिळत नाही. 'माझा बराच वेळ दवाखान्यात गेल्याने मला वेळ मिळाला नाही', अशी भिन्न-भिन्न कारणे देतात. **दवाखान्यातील औषधोपचाराने व्याधी ठीक होत नसेल तर राजयोगाचे प्रयोग करून पहावेत. त्यासाठी राजयोगाच्या आधारे बनवलेली निरोबिक्स ही उपचार पद्धती चांगली आहे. अनेक उपचार करूनही व्याधी ठीक होत नसेल तर असे समजावे की गतजन्मांच्या विकर्मानुसार आलेले हे कर्मभोग मला आनंदाने चुकते करावयास हवेत.** त्याचबरोबर त्रिकाल-ज्ञानी होऊन दुसरा हा विचार करावा की मी आत्म्याने प्रथमतः सर्वोत्तम गुणवत्तेचे निरोगी सतोप्रधान शरीर धारण केले होते परंतु ८४ जन्म घेत असताना आत्म्याच्या पतना-बरोबर शरीराच्या गुणवत्तेचेही पतन होत गेले. या अंतिम जन्मात त्याची गुणवत्ता ती काय राहणार? आताचे हे शरीर कलियुगातील तमोप्रधान अशा पाच तत्वांनी बनलेले आहे. त्याच्याकडून तुम्ही अधिक सुदृढ राहण्याची अपेक्षा ठेवू शकत नाही. तुम्ही ज्ञानी असल्यामुळे तुमच्या मनी हा संकल्प यायला पाहिजे की, या व्याधीमुळे आत्म्याला तीव्र गतीने पावन करण्याची प्रक्रिया आरंभ झाली आहे. या प्रक्रियेत साधकाला सहनशीलतेचा व अशरीरी बनण्याचा फार उपयोग होतो. परंतु व्याधीची पीडा सहन झाली नाही की मनात चिंता निर्माण होते. व्याधीला त्रस्त होऊन हा देखील संकल्प येतो की लवकरात लवकर एकदाचे येऊ देत बाबा सत्ययुग. असा हतबलयुक्त संकल्प येणे म्हणजे प्रभूमिलन, संगमयुगी पुरुषार्थी जीवनमुक्ती आणि सत्ययुगी प्रारब्ध रूपातील जीवन मुक्तीपासून दूर जाणे होय. म्हणून धैर्यवत होऊन आपल्या व्याधीचा सहज सामना करावा. आपली लढाई आहेच आत्म्याचे विकार व शरीराच्या विकारांविरूद्ध. लढाई अर्थात प्रतिकूल परिस्थितींचा सामना. अशा प्रतिकूल परिस्थितीतही आपले लक्ष्य, योगस्थिती व नारायणी नशेपासून यत्किंचितही विचलीत न होता आपण पुरुषार्थ करीत राहू तर त्याचे अधिक मार्क्स जमा होतील. असे अधिक मार्क्स जमा करावयाचे असतील तर आपल्या व्याधीविषयी अकारण चालणाऱ्या संकल्पांना व वाणीला लगाम घालणे आवश्यक आहे. **आपल्या लौकिक परिवारा-तील व्यक्तींना तसेच डॉक्टरांना स्वतःच्या व्याधीविषयी माहिती अवश्य द्यावी. परंतु भेटावयास येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसमोर आपल्या व्याधीचे व त्यावरील उपचारांचे सविस्तर वर्णन करू नये. असे वारंवार वर्णन करणे म्हणजे त्या व्याधीचे आवाहन केल्यासारखे आहे. व्याधीची काळजी अवश्य घ्यावी परंतु काळजी मात्र करू नये.** अशा काळजीतून मुक्त होण्यासाठी आपला वेळ आपल्याला आवडेल त्या ईश्वरीय सेवेत अथवा राजयोगात व्यतित करावा. तसेच स्वतःला कर्मयोगात व्यस्त ठेवावे. ईश्वरीय गीतांच्या सी.डी. ऐकाव्यात अथवा 'पीस ऑफ माईंड' वरील प्रेरणादायी कार्यक्रम पहावेत. डी.डी.भारतीवर दुपारी १ ते २ च्या वेळात असलेले चांगले शास्त्रीय संगीत व वाद्यसंगीत श्रवण करावे. त्यापासून निर्भेळ व सात्विक आनंद प्राप्त करून आपली खुशी अबाधित ठेवावी. उच्चप्रतीचे संगीत ऐकणे हा सत्ययुगी संस्कार आहे. तुम्ही श्रीमतानुसार काहीही करा परंतु संगमयुगावर आपली खुशी गायब होऊ देऊ नका. खुशी गायब तर पुरुषार्थ गायब, पुरुषार्थ गायब तर सत्ययुगातील उच्चपदही गायब होईल. **बंधूनो, स्वतःच्या**

देहातील मोह, व्याधीची चिंता व व्याधीमुळे निर्माण होणारे मृत्युचे भय मनाला उदास करून टाकते. मायेने निर्माण केलेली ही उदासीनताच भविष्यातील सत्ययुगात दास अथवा दासी बनण्यासाठी निमित्त बनते. म्हणून सतर्क होऊन तुम्हास हे निश्चित करावयाचे आहे की भविष्यात मज आत्म्याला देव बनावयाचे आहे अथवा देवदास?

दुसऱ्या प्रकारचा मोह हा निकटच्या संबंधात निर्माण होत असतो. परिवारात एकमेकांवर प्रेम करीत असताना प्रेमात विकृती निर्माण होऊन प्रेमाची जागा मोह हा विकार कधी घेतो हे समजतच नाही. तो आत्म्यावर आपले जाळे टाकतो म्हणूनच त्याला मोहजाळ असे म्हणतात. बंधूंनो, मोह हा विकार आंतर्आत्म्यात अव्यक्त अवस्थेत वास करीत असतो आणि ज्यावेळी प्रिय व्यक्तीचा मृत्यु होतो त्यावेळी तो शोकाद्वारे व्यक्त होत असतो. तसेच परिवारात कुणाला छोटासा जरी अपघात झाला अथवा कोणी अचानक आजारी पडला तरी काळजात चर्र होते. असे चर्र होणे हे मोहवश असल्याचे लक्षण आहे. अर्थात हे लक्षण ज्याचे त्यालाच जाणवत असते. कलियुगात कोणाचा मोह कोणात राहिल हे सांगता येणार नाही. एखाद्या लोकप्रिय नेत्याने शरीर सोडल्यास हजारो लोक शोकाकुल होतात. इतकेच नव्हे तर घरातील कुत्रा, मांजर अथवा अन्य पशू मृत झाल्यावर एखाद्या कुटुंबावर कसा दुःखद प्रसंग ओढवला या विषयीच्या बातम्याही प्रसिद्ध होतात. **मोहवश व शोकवश होण्यालाच अज्ञानी लोक प्रेमाचे नांव देतात. अशाप्रकारे अज्ञानवश प्रेम व मोह याची फार मोठी गल्लत केली जाते. ही गल्लत तर काही वेळा ज्ञानीही करीत असतात. परंतु खरा ज्ञानी तोच जो संबंध संपर्कातील मनुष्यआत्म्यांवर प्रेम करीत असताना आपण मोहवश तर होत नाही ना, याची प्रत्येक प्रसंगी सावधानता ठेवून स्वतःचे परिक्षण करीत असतो.** कोण कधी व कोणासाठी मोहवश होईल हे सांगणे कठीण असते. निमित्त्य टिचरने शरीर सोडले असता सेंटरवरील कन्यांच्याही नेत्रात पाणी तरळताना दिसते. बंधूंनो, वाईट वाटणे, दुःख होणे, अश्रू गाळणे ही मोहवश झाल्याची निशाणी नव्हे काय? नष्टोमोहः होण्यासाठी स्वयं परमात्म्याने अनेक ज्ञानमुरल्या प्रस्तुत केल्या आहेत. त्या ज्ञानमुरल्या श्रवण करणारेच ब्रह्मावत्स, मोहाच्या शृंखलेत बद्ध झाले तर अन्य आत्म्यांना या विकारातून बाहेर कोण व कसे काढणार? आपणच आपल्या देहसंबंधियांच्या मृत्युपश्चात शोकाकुल झालो तर अज्ञानी लोकही आपसात चर्चा करतील की कालपर्यंत मोहाला जिंका असे सांगणारेच आज मोहवश झाले आहेत. अशाप्रकारे अज्ञानी लोकांकडूनही मोहवश अथवा नापास होण्याचा शिक्का बसणे ही नामुष्की नव्हे काय? आता संगमयुगाचा अत्यल्प काळ बाकी राहिला आहे. या उर्वरित काळात मोहमुक्त व शोकमुक्तीचे संस्कार धारण केले नाही तर पूर्णतः मोहमुक्त व शोकमुक्त अर्थात जीवनमुक्त असलेल्या सत्ययुगात आपला जन्म होऊ शकेल काय? म्हणून राहिलेल्या त्या अमूल्य काळातही तुम्ही मोहासहित अन्य विकारांना जिंकून आपली आत्मिक स्थिती शक्तिशाली बनवलीत तरी फार मोठी बाजी मारण्यासारखे आहे. अर्थात त्यासाठी अधिक योगयुक्त होऊन देहाभिमानाचा त्याग करणे आवश्यक आहे. या पहिल्या त्यागातच तुमचा दैवी भाग्याचा सूर्य उदित होणार आहे.

द्वापरयुगाच्या आरंभी देहाभिमानाच्या मृतिकेत (मातीत) मानवाद्वारे या मोहाचे बीज पेरले गेले. मी देह आहे, माझे नातेसंबंधी व समाजातील माणसेही देह आहेत. तसेच देह हाच कर्ता करविता आहे म्हणून त्याचा विनाश होणे ही फार मोठी दुःखद घटना आहे. अशा अज्ञानयुक्त संकल्पांचे मोहाच्या बीजावर जलसिंचन होऊन त्या बीजातून मोहाचे एक रोपटे निर्माण झाले. दोन युगांच्या कालावधीत देहाचे भिन्न-भिन्न विकारांमुळे झालेले मृत्यु तसेच स्वतःच्या देहाचा मृत्यु समीप आल्याची जाणीव इत्यादी कारणांमुळे निर्माण होणाऱ्या दुःखद संकल्पांचे खतपाणी या रोपट्याला घातले गेले. फलस्वरूप कलियुगाच्या आरंभी या रोपट्याचा वृक्ष तर कलियुगाच्या अंताला त्याचा विशाल वटवृक्ष झाला आहे. **हा वटवृक्ष मुळांसहित उखडून टाकावयाचा असेल तर आत्माभिमान, परमात्माभिमान, आदि-अनादि स्वरूपाची दिव्य स्मृती व स्वधर्माचे वादळ आंतर्आत्म्यात निर्माण करा. या वादळातून निर्माण होणारा आवाज हाच असेल की, मी देह नाही आत्मा आहे. देह रथ आहे तर आत्मा रथी आहे. देह आत्म्याचे वस्त्र आहे.'** बंधूंनो, आंतर्आत्म्यातील या

वादळानेच आत्म्याचे अकल्याण करणारा हा विषारी वृक्ष उखडला जाईल. हा वृक्ष पूर्णतः नष्ट व्हावा ही परमात्म्याची इच्छा आहे. त्यासाठीच तर त्याने मनुष्यआत्म्यांत योगाग्नी निर्माण केला आहे. त्या योगाग्नीने या वृक्षाला भस्मिभूत करून टाका. जर संपूर्ण वृक्षच जळून खाक झाला तर त्याच्या फळांमधील बीजेही जळून जातील. अशाप्रकारे मोहाच्या या वृक्षाला पूर्णतः नष्ट करणे हे प्रत्येक राजयोग्याचे परमकर्तव्य आहे.

मोह हा गोड-गोड बोलणाऱ्या व छुप्या पद्धतीने काटा काढणाऱ्या कपटी शत्रूप्रमाणे आहे. **मोह आत्म्याचा मधुमेह आहे. आरंभी मधुर (सुखदायी) वाटणारा हा मोह अंताला मात्र दुःख देणारा आहे. या अलौकिक परिवारातही असे काही युगल आहेत की ज्यांनी एकेमकांच्या सहवासात चाळीस वर्षाहून अधिक काळ व्यतित केलेला आहे. परंतु त्यातील कोणी एकाने शरीर सोडल्यास त्यांची मोहवश स्थिती कित्येक वर्ष राहिल्याने, ते त्या दुःखातून सहजासहजी मुक्त होत नाहीत**. अर्थात त्यांची ही दुःखद स्थिती त्यांच्या पुरुषार्थी जीवनात फार मोठी बाधा निर्माण करते. फलस्वरूप त्यांची योगस्थितीही दोलायमान होते. राजयोगी त्यालाच म्हणावयाचे जो अशा प्रतिकूल परिस्थितीतही शरीर सोडलेल्या आत्म्याला योगदान देऊन बंधनमुक्त होतो. त्याचे सर्व संबंध एका परमात्म्याशी जोडले गेले असल्याने त्याला कुणाच्याही मृत्युपश्चात अंशमात्रही दुःख होत नाही. अशा अचल, अडोल राहणाऱ्या व प्रसंगी नेत्रातून एकही अश्रू येऊ न देणाऱ्या साधकाविषयी लोक मात्र असे म्हणतात की हा तर कठोर हृदयाचा मनुष्य आहे. वास्तविक भगवद्गीतेतील श्रीमतानुसार मोहवश न होता, स्थितप्रज्ञ राहून शरीर सोडलेल्या आत्म्याला त्याच्या कल्याणार्थ योगदान करणाऱ्या योगी तू आत्म्याला पाषाणहृदयी म्हणणे ही तर अज्ञानाची परिसीमा आहे. अर्थात असा योगी तू आत्मा कोणतेही कर्म करताना लोकांना काय वाटेल याचा विचार न करता परमात्म्याला काय वाटेल याचा तो विचार करतो. तो हे जाणतो की पृथ्वीच्या या विराट रंगमंचावर मी आत्मा परमात्म्याच्या श्रीमतानुसार विशेष पार्ट बजावित असल्याने माझ्या प्रत्येक कर्माचे चित्रिकरण होत आहे अर्थात आपल्या कोणत्याही दुःखद कर्माचे चित्रिकरण होऊ नये यासाठी तो सतर्क असतो. काही लोकांचे असेही म्हणणे असते की अशा प्रसंगी दुःखाचे नाटक करून डोळे ओले करावेत. परंतु त्या दिग्दर्शकाला या महानाट्यात दुःखाचे उपनाटक करणे अंशमात्रही पसंत पडणार नाही. जे परमात्म्याला पसंत नाही असे कोणतेही कर्म राजयोगी करीत नाही. स्वतः परमात्म्याने ज्या आत्म्यांना मास्टर सुखकर्ता, दुःखहर्ता बनवून संपूर्ण विश्वाचे दुःख दूर करण्यासाठी निमित्त बनविले आहे ते महान आत्मे लोकलाजेस्तव अशा प्रकारचे नाटक कदापी करणार नाहीत. संगमयुग हे कर्मबंधनमुक्त आणि कर्मातीत होण्याचे विशेष युग आहे. त्यासाठी प्रत्येक ब्रह्मावत्साने असा विचार करावा की, जर माझे संगमयुगी ब्राह्मणजीवन हिरेतुल्य आहे तर त्या हिऱ्याला मोहाचे डाग का पडू द्यायचे? तुम्ही मोहजीत बनला नसाल तर दृढ प्रतिज्ञा करावी की या क्षणापासून मी आत्मा पूर्णतः नष्टोमोहः बनणार आहे. त्याचबरोबर अमृतवेळी बापदादांशी रुहरिहान करून विशेष शक्तींची किरणे प्राप्त करावीत. राजयोगाने मन, बुद्धी व संस्कार शीतल होतात. ही शीतलताच उष्ण अशा मोहाला नष्ट करते. अशाप्रकारे भिन्नभिन्न पुरुषार्थाद्वारे साधक नष्टोमोहः बनू शकतो. नष्टोमोहः बनल्यानंतरही अन्य कोणाचा मोह साधकात राहू नये यासाठीही पुरुषार्थ करावा लागतो. **त्यासाठी प्रत्येक ब्रह्मावत्साने आपल्या मित्रसंबंधी व नातेवाईकांना काळवेळ पाहून युक्तीयुक्त सांगून टाकावे की मी कोणाच्याही मृत्युपश्चात आंतर्बाह्य शोक करणार नाही तसेच माझ्या शरीराच्या मृत्युनंतर कोणीही शोकाकुल होऊ नये. कारण राजयोग्याचा मृत्यु हा मंगलमय असतो**. अशाप्रकारे अन्य आत्म्यांच्या मनाची तयारी करून घेणे व मृत्युनंतरही कुणाच्या मनात मोहवश स्थितीत अटकून न राहणे हे तर राजयोग्याचे उच्चप्रतीचे कर्मकौशल्य व पुरुषार्थ आहे. असा पुरुषार्थ करून तो कमलपुष्पासमान न्यारा व प्यारा राहिल्याने कर्मबंधन मुक्त तद्वतच कलियुगी संबंधातून व कलियुगी घराण्यातून मुक्त होतो. अशी मुक्ती प्राप्त करणारा आत्माच सूर्यवंशी देवी-देवता घराण्यात जन्म घेण्याचे महान भाग्य प्राप्त करतो. असे भाग्य प्राप्त करण्यासाठी केवळ मोहालाच नव्हे तर

पाच विकारांना जिंकणे अनिवार्य आहे. **त्यासाठी परमात्म्याचे महावाक्य आहे की, 'काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार इन पाँच भूतोंको नष्ट करो।' मोहवश होणे अर्थात भूताच्या अधीन होऊन त्याच्याबरोबर दोस्ती करणे होय. ही दोस्ती साधकाला महागात पाडणारी आहे.** अशाप्रकारे साधक मोहाला जिंकू शकला नाही तर निर्मोही असलेल्या मोहनच्या राज्यात तो आपला पहिला जन्म प्राप्त करू शकेल काय? मोहजीत बनण्यासाठी मनात ही संकल्पना हवी की, मी आलोय एकटा व जातानाही एकटाच जाणार आहे. अर्थात मी आत्मा ज्यावेळी हा देह घेऊन आलो त्यावेळी एकटाच आलो व ज्यावेळी हा देह सोडून पुढील प्रवासासाठी जाईन त्यावेळी मज आत्म्यासोबत कुणीही नसेल. बंधूनो, मनुष्य-सृष्टीचा हा पूर्वनियोजित ड्रामा आहे. या ड्राम्यात प्रत्येक आत्म्याचा दैहिक जन्म, त्याचा जीवनकाळ व जीवनातील कर्मभोगही निश्चित आहे म्हणून परिवारात कुणाला काही व्याधी झाल्यास मोहवश होऊन दुःखी होणे हे अज्ञान आहे. दुःख करून कुणाचेही कर्मभोग कधीच कमी होत नसतात परंतु आत्मिक व दैहिक सेवा करून मात्र परिवारा-तील सदस्यांचे दुःख हलके होऊ शकते.

जडजडीभूत झालेल्या भौतिक देहाचा मृत्यु मानवासाठी अटळ व आवश्यकही आहे. जन्म-मृत्यु हे निसर्गाचे अनादि व्यवस्थापन आहे. जर कोणी असे म्हणेल की मला व माझ्या प्रियजनांना मृत्यूच नको तर त्याचे ते बोल हास्यास्पद होतील. कोणत्याही विषयावर सखोल चिंतन करण्याची मज आत्म्याला अज्ञानातही सवय होती. मृत्युच्या घटना पाहून, ऐकून व वृत्तपत्रात वाचून मला इतकेच समजले होते की, या जगात कुणाचाही मृत्यु कधीही होऊ शकतो. आपण वृत्तपत्रात कित्येक वेळा अशी बातमी वाचतो की, नुकतेच विवाहित झालेले पती-पत्नी वऱ्हाडासमवेत आपल्या घरी येत असताना बसला अपघात होऊन त्यात इतरांसह त्या दोघांचेही निधन होते. अर्थात एकही दिवस त्यांनी एकमेकांच्या सहवासात व्यतित केलेला नसतो. समाजातील अशा अनेक दुर्घटनायुक्त बातम्या वाचूनही वृद्धावस्थेपर्यंत दीर्घकाळ सहवास लाभणाऱ्या युगलांनी मात्र कुणा एकाच्या मृत्युपश्चात वर्षानुवर्षे व्यथित होत राहणे कितपत योग्य आहे? वैवाहिक जीवनात हे निश्चित असते की पती-पत्नीपैकी कुणाचा तरी काही वर्षे आधी तर कुणाचा काही वर्षानंतर मृत्यु होणार असतो. ज्या घटना अटळ व निश्चित आहेत त्या घटनांकडे साक्षीभावाने पाहून निश्चिंत रहावे. ही निश्चिंती त्याचवेळी येईल ज्यावेळी तुम्ही हा विचार कराल की, त्या संबंधाचे प्रारब्ध व ऋणानुबंध इतकेच होते. मृत्युनंतरही आत्म्याला शांती व जन्मोत्तर सुख प्राप्त व्हावे असे वाटत असेल तर योगी तू आत्म्याने योगदान करावे व सर्वसाधारण लोकांनी प्रार्थना करावी की हे ईश्वरा, त्या आत्म्याला शांती लाभू दे व त्याचा नवजन्म चांगल्या घराण्यात होऊन त्याला सुख लाभू दे. आम्ही त्याला आमच्या बंधनातून मुक्त केले आहे.' **गावाला जाताना ज्याप्रमाणे आपण संबंधित व्यक्तीला 'हॅपी जर्नी' म्हणून सहज निरोप देतो तद्वतच मृत्युनंतर त्या आत्म्याला आपल्या कर्मबंधनातून मुक्त करून नवजीवनासाठी शुभेच्छा द्याव्यात. त्याच्या माघारी दुःख आणि शोक केल्याने मात्र तो आत्माही दुःखी होतो व त्याला पुनर्जन्म घेण्यासाठी फार मोठा प्रतिबंध निर्माण होतो.** जरी त्या आत्म्याने पुनर्जन्म घेण्यासाठी मातेच्या गर्भात प्रवेश केला तरी तेथेही त्याला व काहीएक कारण नसताना त्याच्या नूतन आईला अस्वस्थता वाटू लागते. बंधूंनो, असे आहेत मोहवश व शोकवश होण्याचे सूक्ष्म व दूरगामी परिणाम! अशा या भिन्न-भिन्न प्रतिबंधातून तो आत्मा त्याचवेळी मुक्त होईल ज्यावेळी संबंधित सर्व व्यक्ती मोहातून व शोकातून मुक्त होतील. याविषयी एक कथा अशी आहे की, एका कुटुंबातील बारा-तेरा वर्षाच्या मुलीचा अपघाती मृत्यु होतो. अर्थातच तिचे आई-वडील अत्यंत दुःखी होतात. या दुःखाचा आवेग पुढे कित्येक वर्ष राहतो. अशाच एका रात्री ती मुलगी आपल्या आईच्या स्वप्नात येते. त्या स्वप्नातील दृश्य असे असते की त्या मुलीबरोबर अन्य दहा-बारा मुलीही आपल्या हातात प्रज्वलित झालेल्या मेणबत्त्या घेऊन उभ्या असतात. त्या मुलीच्या हातातही मेणबत्ती असते परंतु ती विझलेली असते. त्या स्वप्नातच आई प्रेमाने आपल्या मुलीला विचारते, 'बाळा, तुझ्या हातातील मेणबत्ती का विझलेली आहे?' त्यावर ती उत्तर देते, ही मेणबत्ती पेटविण्याचा मी अनेक वेळा प्रयत्न

केला परंतु तुम्हा दोघांचे दुःखाश्रू तिच्यावर वारंवार पडत असल्याने ती पेटू शकली नाही. या मार्मिक कथेवरून सूज्ञ वाचकांना समजलेच असेल की शरीर सोडलेल्या आत्म्यासाठी दुःख करीत राहणे कुणसाठीही सुखदायी नसते. अर्थात त्यासाठी नष्टोमोहः स्थिती बनविणे आवश्यक आहे. **नष्टोमोहः स्थिती कशी असावी याचा उत्तम आदर्श पिताश्रींनी घालून दिला आहे. ज्यावेळी मातेश्वरींनी शरीर सोडले. त्यावेळी या महापुरुषाच्या नेत्रात एकही दुःखाश्रू आला नाही म्हणून शिवबाबांचे मार्गदर्शन आहे की फॉलो फादर अँड मदर, नॉट सिस्टर अँड ब्रदर! अर्थात एखाद्या महारथीच्याही नेत्रात प्रसंगी अश्रू आले तरी त्याला फॉलो करू नका.** अशाप्रकारे तुमच्यावर कोणाही देहधाऱ्याचा प्रभाव पडता कामा नये. लौकिक व अलौकिक परिवारात रहात असताना आपल्या लक्ष्याची व लक्ष्यदात्याची कधीही विस्मृती होऊ देऊ नका. त्याचबरोबर मनाचा बॅलन्स जाऊ न देता, श्रीमतानुसार सर्व कर्मात बॅलन्स साधणे आवश्यक आहे. म्हणून संगमयुगावर बॅलन्स साधताना निर्णय शक्तीचा फार उपयोग होतो. तो बॅलन्स कसा साधावयाचा याचे मार्गदर्शन ज्ञानमुरलीत नेहमीच केले जाते. **कोणत्याही संबंधात मोह राहू नये यासाठी परमात्म्याचे महावाक्य आहे की, 'बच्चे सारे संबंध एक बापसे जोडना; अब बाबाही तुम्हारा संसार है।'** अशाप्रकारे मोहजीत बनण्यासाठी ज्ञानमुरलीत अनेक युक्त्या सांगितल्या जातात. तुम्ही तुमच्या स्थितीनुसार कोणत्या युक्त्यांचा अवलंब करावयाचा हे तुम्हालाच ठरवायचे आहे. काही वर्षापूर्वी अमृतकुंभमध्ये मोहजीत राजाची कथा आली होती. त्यामध्ये राजा, राणी, राजकुमार, प्रधान आणि प्रजा या सर्वांचीच उच्चप्रतीची मोहमुक्त अवस्था दर्शविली आहे. अशी मार्मिक व बोधप्रद कथा पुन्हा एकदा प्रसिद्ध केली जावी. कदाचित ती कथा वाचूनही एखादा साधक मोहमुक्त होऊ शकतो.

वस्तु, वैभव व धनसंपत्तीविषयी असलेल्या आसक्तीला काही लोक मोह असा चुकीचा शब्द प्रयोग करतात. वास्तविक मोह हा केवळ जीवात्म्याविषयी वापरण्याचा शब्द आहे तर वस्तु, वैभव आणि धनसंपत्तीविषयी असलेल्या आसक्तीला लोभ म्हणणे योग्य होईल. सर्वसामान्य माणसांना एकवेळ लोभावर विजय प्राप्त करता येईल परंतु मोहावर विजय मिळविणे अत्यंत कठीण आहे. कारण मानवमात्रावर जन्म-जन्मांतर मोहवश होण्याचे संस्कार झालेले आहेत. फलस्वरूप संबंधितांच्या मृत्युपश्चात आपण मोहवश होऊन शोक करीत आहोत हे त्यांच्या ध्यानातच येत नाही कारण ते मोहवश होण्यालाच प्रेम समजतात. कोणाच्याही मृत्युपश्चात ज्याच्या नेत्रातून झटकन अश्रूधारा वाहू लागतात त्याच्या-विषयी बोलले जाते की, तो फार भावनाप्रधान आहे. परंतु ही शोक करण्याची भावना मोहामुळे निर्माण झाली आहे हे कुणाच्याच ध्यानात येत नाही. अशाप्रकारे मनुष्यआत्मे मोहाच्या अर्थात रावणाच्या खोल दरीत घसरत चालले आहेत. या दरीतून मनुष्य आत्म्यांसाठी दुष्ट रावणाचे निरंतर आवाहन आहे की, 'मुझे तुम्हारा मन दो, मन दो, मन दो।' या 'मन दो' चा अर्थ आहे, मनुष्याने केवळ विकारी व व्यर्थ संकल्प करावेत. अधःपतनाच्या या दरीतून मन दो, मन दो चा निरंतर व सूक्ष्म आवाज येत असल्याने या सूक्ष्म दरीला आपण नाव देऊया 'मन दो दरी'. आतापर्यंत अनेक मनुष्य आत्म्यांनी आपले मन या रावणाला दिल्यामुळे ते सर्वजण रावणाच्या मन दो दरीत बंदिस्त झालेले आहेत. **परंतु संगमयुग आरंभ होताच या दरीच्या वरील बाजूस समस्त आत्म्यांचा संरक्षक परमात्मा ज्ञान व योगाची शस्त्रे घेऊन ब्रह्मारूपात उभा आहे. जो आत्मा या दरीतून बाहेर येण्यासाठी आपला हात वर करेल त्याला परमात्मा आपला हात देऊन निश्चितपणे बाहेर काढेल व अल्पावधीत ज्ञान व योगाच्या शस्त्रांद्वारे तो त्यांना मोहजीत बनवून त्यांच्या मस्तकी विजयी होण्याचा सन्माननीय ताजही ठेवेल.** परंतु ज्या आत्म्यांनी मोहवश राहण्याचेच निश्चित केले आहे, त्यांच्यासाठी परमात्मा काहीही करू शकत नाही. बंधूंनो, सत्ययुग-त्रेतायुगात म्हणजे तब्बल २५०० वर्षे भारत मायमुक्त व मोहमुक्त होता. तेथे कुणाच्याही मृत्युपश्चात शोक व्यक्त केला जात नव्हता अथवा कसल्याही प्रकारच्या शोक सभा घेतल्या जात नव्हत्या. आज तोच भारत पूर्णतः मोहवश झाला आहे. हे मोहवश होण्याचे संस्कार प्रथमतः पुराणकथांच्या द्वारे केले गेले आहेत. कसे, ते आपण पुढील भागात पाहू या. *(क्रमशः)*

तणावाचे कारण व निवारण

ब्र.कु.भगवानभाई, शांतिवन-आबूरोड.

जगातल्या लोकांना आज सर्वात जास्त त्रास कसला असेल तर तो तणावाचा आहे. त्याचबरोबर संशोधनांती असंही आढळून आलं आहे की माणसाला होणाऱ्या अधिकतर दुखण्यांचे मूळ कारण मनोकायिक स्वरूपाचं असतं. म्हणजे ती दुखणी आधी मनात सुरू होतात व नंतर त्यांचं शारीरिक स्वरूप दिसू लागतं. माणसाची मानसिकता ही तणावामुळे सहज प्रभावित होणारी असल्यामुळे त्याची कारणं व निवारण प्रस्तुत लेखात आपण पाहणार आहोत.

आपली बुद्धी ज्ञानाच्या आधारे निर्णय घेण्याचे कार्य करते आणि मन सतत संकल्प रचण्यात व्यस्त असते. मनातून अनेक विचारधारा प्रस्फुटित होत असतात त्याचा प्रभाव मनुष्याच्या जीवनावर पडत असतो. परंतु जर आपली बुद्धी, मनावर नियंत्रण ठेवत नसेल तर मन स्वतःच्या इच्छेनुसार सैरावैरा धावत सुटते म्हणूनच मनाला चंचल बेलगाम घोड्याची उपमा दिली जाते. सुरूवातीला अशा स्थितीमध्ये मनाला आनंद अनुभवाला येतो. परंतु अचानक जेव्हा त्याला धोका प्राप्त होतो अर्थात एखादी गोष्ट मनाविरूद्ध होते तेव्हा अनेक व्यर्थ संकल्प वा विकल्प चालू लागतात, परिणामतः मनात तणाव निर्माण होतो.

वास्तविक आपले जीवन हे ईश्वरी वरदान आहे परंतु मनावर नियंत्रण नसेल तर तेच जीवन नर्कमयसुद्धा होऊ शकते. अनियंत्रित मनामध्ये काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार, ईर्ष्या, घृणा, वैर-विरोध, व्यसन इत्यादी मनोविकारांचा वास असतो. या मनोविकारांमुळेच जीवन नर्कतुल्य बनते. याउलट नियंत्रित मन नेहमी समर्थ व श्रेष्ठ विचार करत असते. त्यामुळे ते तणावमुक्त असते तसेच सद्गुणांनी युक्त असते. त्यामुळेच म्हटले जाते, 'मन के हारे हार, मन के जीते जीत' म्हणूनच आपल्या मनावर नियंत्रण ठेवणारा साधक हा खरोखर धन्य आहे. परंतु आजच्या मानवाचे मन अनियंत्रित असल्याने त्याला दैनंदिन जीवनात मोठ्या प्रमाणावर तणावाला तोंड द्यावे लागत आहे, याची मुख्य कारणं व निवारण पुढीलप्रमाणे आहेत -

❒ वर्तमान व भविष्याची चिंता केल्यामुळे तणावाची निर्मिती

सदैव लक्षात ठेवा की ज्याने वर्तमानाला सफल केले आहे त्यांचे भविष्य हमखास चांगले असणारच. याउलट जो वर्तमानाला गमावतो आणि भविष्याची चिंता करत बसतो, त्याचे वर्तमान तर व्यर्थ जातेच पण त्याचे भविष्य सुद्धा तो चांगले बनवू शकत नाही. त्यामुळे चिंता करण्याऐवजी प्रभू चिंतन करा. वर्तमानसमयी श्रीमताप्रमाणे वागून आपला समय, श्वास व शक्ती सफल करा म्हणजे वर्तमान आणि भविष्य निश्चितच चांगले होईल. वास्तविक प्रत्येकाची हीच इच्छा असते की आपले सर्व काही चांगले व्हावे परंतु ही इच्छा पूर्ण होण्यासाठी कर्माच्या गुह्यगतीला लक्षात ठेऊन श्रेष्ठ कर्म करणे आवश्यक आहे पण कर्मफळाची इच्छा मनामध्ये ठेऊ नका तरच आपण तणावापासून दूर राहू शकू. **गीतेचे महावाक्य नेहमी लक्षात ठेवा की जे घडून गेले ते चांगले, जे घडत आहे ते सुद्धा चांगले आणि भविष्यात जे घडणार आहे ते आणखीनच चांगले असेल तर मग चिंता करण्याची गरज नाही. त्यामुळे नेहमी निश्चिंत व तणावमुक्त जीवन जगा.**

❒ जबाबदारीच्या ओझ्यामुळे तणावाची निर्मिती

प्रत्येक व्यक्तीला काही ना काही जबाबदारी असतेच, कुणाला परिवाराची, कुणाला ऑफिसची, कुणाला विशेष सामाजिक कार्याची, कुणाला देशाची. ही जबाबदारी घेतल्यामुळेच मनुष्याच्या जीवनात अनेक गुणांची उत्पत्ती होते. जो आपली जबाबदारी सफलतापूर्वक व सरलतापूर्वक पार पाडतो, तोच जीवनात उन्नती प्राप्त करू शकतो. परंतु कित्येकांवर जबाबदारी पडल्यावर घाबरायला होते. आपल्याला ती पार पाडता येईल की नाही, याची भीती वाटते. परिणामतः तणाव निर्माण होतो. जबाबदारी जणू त्यांना सतावते. असे लोक सुखाने झोपूसुद्धा शकत नाहीत. हे कार्य वेळेवर होईल का? हा माझे ऐकेल का? ती व्यक्ती मदत करेल का? अशा अनेक प्रश्नांच्या विळख्यात ते गुरफटलेले असतात.

त्यामुळे त्यांचा चेहरा सदैव तणावग्रस्त पहायला मिळतो.

वास्तविक आपण जितके आत्मविश्वासी, हिंमतवान, साहसी आणि कार्यक्षम बनू तितके सहजच जबाबदारी पार पाडू शकू. **आत्मविश्वासाबरोबरच परमात्मा पित्यावर सुद्धा विश्वास ठेवा कारण तोच कर्ताकरविता आहे. आपण तर केवळ निमित्त कर्ता आहोत. सर्वशक्तिवान पिता परमात्मा आपल्या सोबत असताना भीती ती कसली ?** त्यामुळे कितीही मोठी जबाबदारी असली तरी ती शिवबाबांकडे सोपवा व स्वतः त्यांच्याशी एकत्रित (कम्बाइण्ड) होऊन, स्वतःला शिवशक्ती समजून कार्य करा म्हणजे सफलता अगदी सहज प्राप्त होईल.

सदैव लक्षात ठेवा आपला कार्यव्यवहार संकल्पाच्या आधारे होत असतो. जर आपले संकल्प समर्थ, सकारात्मक असतील तर कार्यसुद्धा सहजच सफल होईल. याउलट जर संकल्प व्यर्थ व नकारात्मक असतील तर कार्य असफल होईल म्हणून कुठलीही जबाबदारी सांभाळण्यासाठी सरळ-चित्त बना. सरळचित्त बनल्याने मनात कुठलेही व्यर्थ संकल्प येणार नाहीत व कार्य सफल होईल.

❒ संबंधातील कटुता तणावाला कारणीभूत

जर आपसात स्नेह व सहयोगाची भावना नसेल तर संबंधात कटुता निर्माण होते. त्यामुळे मानसिक तणाव निर्माण होतो. आपसातील संबंधात काही अपेक्षा किंवा अधिकार असतात परंतु जेव्हा त्यांची पूर्ती होत नाही तेव्हा संबंधात तणाव निर्माण होण्याची शक्यता असते. तात्पर्य म्हणजे दुसऱ्याकडून काही अपेक्षा करणे, स्नेह-सहयोगाची इच्छा ठेवणे हे सुद्धा संबंधांमध्ये तणाव निर्मितीचे कारण असते. वास्तविक प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव, संस्कार, क्षमता या भिन्न-भिन्न आहेत. हे लक्षात ठेऊन आपण शक्य तितके निरपेक्ष प्रेम करायला शिकलं पाहिजे. कुणाचेही दोष न पाहता, त्यांच्या गुणांचेच अवलोकन केलं पाहिजे म्हणजे संबंधातील मधुरता टिकून राहिल. दुसऱ्यांविषयी मनामध्ये जो वैरभाव वा कटुता निर्माण झालेली असते ती निघून जाऊन, आपसात पुन्हा प्रेमभाव जागृत व्हायला मदत होईल. त्याचबरोबर संबंधीत व्यक्तीवर कधीही अधिकार गाजवू नका. प्रत्येकाला स्वतंत्र वागू द्या तरच तणावमुक्त संबंध राहतील.

❒ अहंकारामुळे तणावाची निर्मिती

अहंकारी व्यक्ती हा स्वतःला चांगला आणि दुसऱ्यांना वाईट समजत असतो. त्यामुळे तो दुसऱ्यांना सन्मान देत नाही. परिणामतः त्यालाही दुसऱ्यांकडून सन्मान प्राप्त होत नाही. अहंकारी मनुष्य जिद्दी स्वभावाचा असतो. तो दुसऱ्याचा सल्ला कधी घेत नाही. दुसऱ्याचे म्हणणे सुद्धा ऐकत नाही. अशा स्वभावामुळे तो स्वतःसुद्धा तणावग्रस्त स्थितीत असतो तसेच दुसऱ्यांसाठी तणाव निर्माण करतो. म्हणून सर्वजण त्याच्यापासून दूर राहतात. अहंकारी व्यक्ती एकाकी जीवन जगत असते. अहंकारामुळे त्याचा स्वभाव चिडचिडा बनतो. परिणामी त्याची खुर्ची सुद्धा त्याला साथ देत नाही.

म्हणूनच सदैव नम्रतेचे कवच धारण करा. फलस्वरूप तणावापासून सदा मुक्त राहू शकाल. नम्रचित्त मनुष्य सर्वांना आपला मित्र मानतो. तो कधीही लहान-थोर असा भेद करीत नाही. अशाप्रकारे सर्वांशी प्रेमयुक्त व्यवहार करणाराच तणावमुक्त व प्रसन्नचित्त राहू शकतो.

❒ व्यर्थ संकल्प वा विकल्पांमुळे तणावाची निर्मिती

ज्याला व्यर्थ विचार करण्याची सवय आहे तो नेहमीच कमी-अधिक तणावाचा अनुभव करतो. म्हणूनच मनाला नेहमी समर्थ वा शुभ चिंतन करण्यात व्यस्त ठेवा. त्यासाठी रोज सकाळी अमृतवेळेला उठून प्रभूचिंतन करा. 'मी परमात्मा पित्याचा प्रिय बालक आहे. परमात्मा माझा पालनहार आहे, रक्षक आहे, परम हितैषी आहे. माझ्यावर त्याची अमीट छत्रछाया आहे. फलस्वरूप माझ्या जीवनातील प्रत्येक घटना ही कल्याणकारी आहे तर मग मला भीती ती कसली ? मी सदैव निर्भय, निर्विघ्न व निश्चिंत आहे.' अशाप्रकारचे समर्थ चिंतन केल्याने आपले मनोबल वाढते आणि ज्याचे मनोबल मजबूत आहे तोच आत्मविश्वासी व आत्मअभिमानी बनू शकतो. अशा स्थितीमुळे मन व्यर्थ संकल्पांपासून दूर साक्षी अवस्थेत टिकून रहाते. असे स्थिर मन तणावापासून सदैव दूर राहू शकते.

तणावमुक्त जीवन जगण्यासाठी सोनेरी अक्षरात लिहावा असा एक सिद्धांत आहे, 'दुसऱ्याने आपल्याशी जसं वागावं

असं आपल्याला वाटत तसं आपण दुसऱ्यांशी वागलं पाहिजे.' सौजन्याच्या आणि प्रेमळपणाच्या बारीक बारीक कृती करीत रहा. अशा कृतींना नेहमीच चांगला प्रतिसाद मिळतो. दुसऱ्याकडून आपल्या काय अपेक्षा आहेत ते स्पष्ट करा. स्वतःची सचोटी, खरेपणा कमी होऊ देऊ नका व आवश्यक असेल तेव्हा मनःपूर्वक क्षमायाचना करा.

तणाव कमी करण्यासाठी एक अतिशय उत्तम उपाय आहे, जो शास्त्रज्ञांनी अनेक वर्षापासून शोधला आहे. थोडंस औदासीन्य आलेलं असेल तर ते व्यायामाने जाते, आत्मविश्वास वाढतो आणि सर्जनशील विचारांना चालना मिळते. शारीरिक व्यायामाचे मानसिक सुपरिणाम अगदी थोड्या वेळात म्हणजे पाच मिनिटं जलद चालण्यामुळेसुद्धा दिसून येतात. हे असं घडण्यामागचे कारण असं आहे की एकाच वेळी दोन गोष्टींवर लक्ष केंद्रित करणं, आपल्या मनाला कठीण जातं. त्यामुळे लक्ष दुसरीकडे केंद्रित झाल्यावर मनातील औदासीन्य नाहीसं होतं. म्हणूनच बाहेरचे वातावरण गाणं गुणगुणण, फिरायला जाणे, वाचन, एखादा छंद जोपासणे, यासारख्या गोष्टीत मनाला गुंतवले तर मनातील तणाव आपोआप नाहीसा होतो.

वरील सर्व उपायांबरोबर तणावमुक्तीचा सर्वात श्रेष्ठ उपाय म्हणजे राजयोगाचा अभ्यास. आपल्या मनातील विकृतीला दूर करून आपले मनोबल वाढविण्यासाठी, मनाला योग्य दिशा देण्यासाठी राजयोगाचा अभ्यास नियमितपणे करा. राजयोग हीच तणावमुक्त बनण्याची संजीवनी बुटी आहे. राजयोग अर्थात आत्मा आणि परमात्मा पित्याचे मंगलमीलन! सर्व शक्तिवान परमात्म्याशी जेव्हा मन व बुद्धीची तार जुळते तेव्हा आत्म्यातील पवित्रता व शक्ती वाढत जाते. आपले विचार शुद्ध बनतात. विचारांना यथार्थ दिशा प्राप्त होते. मुख्य म्हणजे मनावर नियंत्रण प्राप्त होते. विविध परिस्थितीत आपली बुद्धी संतुलन ठेऊ शकते. दुसऱ्यांच्या विषयी आपली दृष्टी श्रेष्ठ बनते. आपसात बंधुत्वभाव वाढीला लागतो. त्यामुळे संबंधात मधुरता येते. सारांशाने, राजयोगाच्या अभ्यासानेच आपले जीवन संपूर्ण स्वस्थ, सदा प्रसन्न व मंगलमय बनवा, हीच शुभभावना व शुभकामना! ❖❖❖

▶ पान क्र. ८ वरून

वियोगी नाहीतर सहजयोगी, राजयोगी बनविणारे आहे.

ईश्वरी स्नेहाचे पाणी मिळेल तरच ज्ञान अंकुरित होईल. स्नेहाचे फळ संतुष्टता आहे. खरे प्रेम जेथे आहे तेथे हिसाब-किताब होत नाही पण एखाद्याच्या हृदयाला छिद्र असेल तर गळती होईल, प्राप्ती टिकणार नाही. गळती म्हणजे प्रभूशिवाय इतरांशी संबंध वा झुकाव, आकर्षण. गळती म्हणजे शक्तींचा ऱ्हास. कमजोरीला उदासी, निराशा ग्रासून टाकते पण खरे आत्मिक (रुहानी) प्रेम बलवान बनवते. **स्नेहीचे दुसरे लक्षण म्हणजे त्याचा ज्याच्याशी स्नेह आहे त्याची त्रुटी, कमी, अवगुण तो पाहू शकत नाही. तो समान बनावा ही त्याची तळमळ असते. म्हणून आपलेही परम-पित्यावर जिगरी, खरे प्रेम असेल तर आपल्याला देखील लवकरात लवकर समान बनविण्याची तळमळ परमात्मा पित्याला असेल.** सर्व आत्म्यांचा पिता सर्व शक्तिवान परमात्मा ही विश्वातील सर्वोच्च शक्ती (ॲथॉरिटी) आहे. त्या सर्वश्रेष्ठ शक्तीने प्रेमापोटी आम्हा ब्राह्मण आत्म्यांना सत्य ज्ञान, सत्य गुण, सत्य शक्ती, सत्य स्मृती, सत्य प्राप्ती करवून श्रेष्ठ बनविले आहे. तेव्हा आम्हा ब्राह्मण आत्म्यांना त्याचा केवढा अभिमान आणि नशा हवा. हा नशा, हा अभिमान हीच आमच्या खऱ्या परमात्म-प्रेमाची, स्नेहाची पावती आहे. त्यामुळे आपले अंतरंग सदैव प्रभूप्रेमात रंगले पाहिजे. या अनुषंगाने एका कवीने म्हटले आहे -

प्रेम करो परमात्मासे, प्रेम ही सुख का सार है।
प्रेम ही सच्चा जीवन है, प्रेम प्रभू उपहार है।।

खऱ्या सुखाचा शोध

राबिया ही एक सूफी संत होती. एकदा रात्री कंदील घेऊन ती अंगणात काही शोधत होती. एकाने विचारले, 'काय शोधता?' तिने उत्तर दिले, 'सुई हरवलीय.' दुसऱ्याने विचारले, 'कुठे?' राबिया म्हणाली, 'घरात!' त्यावर तो म्हणाला, 'मग इथे कशाला शोधताय? घरात शोधा.'

एव्हाना बरेच जण गोळा झाले होते. तेव्हा ती हसून म्हणाली, 'विद्वानांनो, हेच तर मी तुम्हाला सांगत असते. खरे सुख हे बाहेर शोधू नका. ते आत लपलंय. त्याला आतच शोधा.'

वर्णमालेत गवसले जीवनमर्म

(भाग-१६)

ब्र.कु.डॉ.संजय माळी, पाचोरा.

❒ पी फॉर पंक्चुॲलिटी (Punctuality) अर्थात वक्तशीरपणा

स्वामी विवेकानंद यांचा एक सुविचार आहे. ते म्हणतात, 'अक्षर ज्ञानाबरोबर स्वच्छता, व्यवस्थितपणा आणि वक्तशीरपणा यांनाही महत्व आहे.'

हो, माणसाच्या जीवनरूपी बागेला सुशोभित करणारा वक्तशीरपणा हा एक अत्यंत महत्वाचा सद्‌गुण आहे. संसाररूपी कर्मभूमीवर कर्मयोगी बनून काम करीत असताना, कोणत्याही साधकाला हा गुण पावला-पावलावर खूप उपयोगी पडतो. याचा संबंध वेळ, नियमितपणा आणि आपल्या कामाची जागरूकता याच्याशी आहे म्हणून त्याची माहिती करून घेणे आवश्यक आहे.

कोणतेही काम वेळेवर प्रारंभ करणे व ठरलेल्या वेळातच पूर्ण करणे हाच वक्तशीरपणा होय. आपण देवाकडे सद्‌बुद्धी मागत असतो ना? वक्तशीरपणा किंवा वेळेवर कर्तव्यपालन करण्याची सद्‌बुद्धी हा त्यातलाच एक भाग आहे कारण वेळेच्या सदुपयोगातच जीवनाची सार्थकता आहे. नेमलेल्या कामासाठी त्यावेळी आपण तिथेच असावे असा अर्थ. उदाहरणार्थ, विद्यार्थ्यांनी गृहपाठ वेळेवर करणे किंवा ऑफिस कर्मचाऱ्याने एखादे काम नियोजित वेळेत पूर्ण करणे. या जगात वक्तशीरपणा हा गुण जर प्रत्येकाने अंगिकारला तर येथे स्वर्गाचे अवतरण व्हायला कितीसा वेळ लागेल?

मित्रहो! महान म्हणून गणल्या गेलेल्या व्यक्तींमध्ये वक्तशीरपणा हा गुण प्रकर्षाने जाणवतो. मानवी जीवनात वेळ ही एक अत्यंत महत्वाची गोष्ट आहे हे कोणीही नाकारू शकत नाही. ज्याला वेळेचे महत्व कळते तोच वेळेची खरी किंमत जाणू शकतो. कारण एकदा निघून गेलेली वेळ पुन्हा कधीही परत येत नसते. म्हणून वेळेच्या सदुपयोगाकडे माणसाने आवर्जून लक्ष दिले पाहिजे. या जगात सर्व काही ठरलेल्या नियमाप्रमाणे होत असते. बघा, सूर्य उगवतो, दिवस उजाडतो. कामाला सुरूवात होते. दिवसभर काम असते. सूर्य मावळतो, संध्याकाळ होते. रात्र ही स्वाभाविकपणे प्रत्येकाला विश्रांतीसाठी असते. रात्री योग्य तेवढी विश्रांती घेऊन माणूस ताजातवाना होतो व पुन्हा कामास लागतो. जीवनचक्र फिरत राहते. उन्हाळा, पावसाळा व हिवाळा हे ऋतू चक्रही अगदी ठरल्याप्रमाणे फिरत राहते.

मनुष्य जीवनात आपल्या प्रत्येकाला परमेश्वराने एक विशिष्ट मर्यादित कालावधी नेमून दिलेला आहे. तेवढ्या ठराविक वेळातच आपल्याला आपले जीवित कार्य पार पाडायचे असते. ज्याला ही गोष्ट समजते तो वेळेचे महत्व चांगल्या प्रकारे समजतो. तो वेळेचा कधीच अपव्यय करीत नाही. ठरलेली वेळ जो पाळतो त्याचा आदर सर्वच करतात. दिलेला शब्द जो पाळतो त्याचे कौतुक सर्वच करतात. वेळेवर आणि योग्य ती मदत जो करतो, असा मित्र सर्वांना आवडतो. वेळेचे महत्व ज्याला समजत नाही त्याला कोणीही किंमत देत नाही. हे अगदी खरे आहे. म्हणून माणसाने वेळेचे महत्व ध्यानात घेणे आवश्यक आहे. ज्याला वेळेचे महत्व समजले त्यालाच मनुष्य जीवन कळले. असा माणूस जनमानसात अगदी आदरणीय किंवा वंदनीय ठरतो. काळ आणि वेळेचे माहात्म्य जाणणाऱ्या व्यक्तीला, काळ आणि वेळच महान बनविते.

विद्यार्थ्याच्या अंगी वक्तशीरपणा असेल तर तो विद्यार्थी आदर्श म्हटला जातो. शिक्षक वक्तशीर असेल तर तो शिक्षक, विद्यार्थी प्रिय म्हणून ओळखला जातो. कामगाराच्या अंगी वक्तशीरपणा असेल तर असा कामगार जीवनात यशस्वी होतो. वेळ ही मानवाला मिळालेली परमेश्वरी देणगी आहे हे लक्षात घेतले तर कोणाचेही कल्याण होते. योग्यवेळी नियोजित कार्य करणे हे ज्याला समजले तो खरोखर श्रेष्ठ होय. केवळ एक सेकंद उशिरा पोहोचला म्हणून एक कोटी रुपयाची लॉटरी हुकली असेही होताना दिसून येते. लक्षात घ्या की एका सेकंदाचा फरक पडला म्हणून तुमचे ऑलिंम्पिक सुवर्ण पदकही हुकू शकते. तात्पर्य म्हणजे जीवनातील प्रत्येक सेकंद आणि प्रत्येक क्षण अत्यंत महत्वाचा आहे.

उदाहरणार्थ, बाहेरगावी असलेल्या एका लग्नाला जाण्यासाठी सकाळी सात वाजेची वेळ दिलेली होती. आठ लोक अगदी वेळेवर आलेत. परंतु एक व्यक्ती अजून आलेला नव्हता. त्याची चौकशी केली असता कळले की तो अजून झोपेतूनच जागा झालेला नाही. तो आंघोळ कधी करणार आणि कधी गाडी जवळ पोहोचणार. केवळ त्या एकट्यामुळे नियोजित वेळेपेक्षा गाडी दीड तास उशीरा निघाली. तिकडे नवरीकडील मंडळी वाट पाहून थकले. फोन वर फोन. शेवटी पोहोचली एकदाची तेथे वरात. नवरीकडील मंडळीने सुटकेचा निःश्वास टाकला. लग्न लागले पण अडीच तास उशीराने. बघा, केवळ एका माणसाने दिलेली वेळ पाळली नाही म्हणून एवढा खोळंबा झाला.

दुसरे उदाहरण, आपण बऱ्याच वेळा अनुभवतो अमुक वक्त्याची आज सभा आहे. सभेला उपस्थित सगळे श्रोतागण प्रमुख वक्त्याची वाट पाहत आहेत आणि ते महाशय तब्बल दोन तास उशिराने पोहोचत आहेत. त्याला काय म्हणावे? व्याख्यान श्रवणाचा सगळा मूड खलास. परंतु वक्ता जर वक्तशीर असेल आणि व्याख्यान वेळेवर सुरू झाले व वेळेवर संपले असेल तर आयोजकांना आणि श्रोत्यांना एक आनंददायी पर्वणीच असते, नाही का?

मानवी जीवनाला सुंदर आणि आनंददायी बनवायचे असेल तर वक्तशीरपणा अंगी बाणला पाहिजे. आपण स्वतःही वेळ पाळली पाहिजे आणि इतरांनाही त्या दृष्टीने प्रोत्साहित केले पाहिजे. वक्तशीरपणाचा संस्कार शिकावा आणि आत्मसात करावा लागतो. **जीवनात शिस्त आणि नियम नसतील तर त्या जीवनाला काहीच अर्थ नाही हे आवर्जून सांगावेसे वाटते. ज्याला वेळेचे मोल समजते त्याचे जीवन खरोखर मूल्यवान होते असे तत्व जाणकार मानतात.** काही लोक स्वतःच्या वेळेला योग्य महत्व देतात पण इतरांच्या वेळेला काहीच महत्व देत नाहीत तरीही जीवन कष्टदायक बनते. तात्पर्य म्हणजे आपल्या प्रमाणेच इतरांच्या वेळेचे सुद्धा भान ठेवणे आवश्यक आहे. माणसाला आपल्या आणि इतरांच्या वेळेची किंमत असेल तरच मजा आहे. ज्याला वेळेचे मोल कळले तो या जीवनाला स्वर्ग बनवू शकतो. याउलट ज्याला जीवनाचे मोल कळत नाही त्याचे जीवन नरकाप्रमाणे दुःखदायी बनून जाते. हेच सार आहे.

ज्या माणसाकडे वक्तशीरपणाचा गुण असेल तर तो अनेकांचा विश्वास व प्रेम संपादन करू शकतो. अशा व्यक्तीलाच इतरांचा सहयोग प्राप्त होतो. तो सर्वप्रिय बनतो. वास्तविक पाहता वेळ ही भगवंताची शक्ती आहे. म्हणूनच ईश्वराला महाकाल असे एक नाव आहे. जो काळ व वेळेचा सदुपयोग करतो तो या जगात 'अमरपद' प्राप्त करतो, अमर लोकीचे राज्य मिळवितो. बरेच लोक वेळेचा सदुपयोग न करता, केवळ काहीतरी टाइमपास करीत राहतात. त्याने काहीच साधत नाही. एका कवीच्या ओळी आठवतात,

वक्त है कम लंबी मंजील, तुम्हे तेज कदम चलना होगा।
हे परम तपस्या के पथिको, तुम्हे नूतन पथ रचना होगा।

वेळेलाच महत्व असते. वेळ निघून गेल्यावर एखादे काम करणे म्हणजे वराती मागून घोडे. नदीत बुडणाऱ्या माणसाला योग्य वेळी वाचविले तरच त्याचे प्राण वाचतील अन्यथा तो बुडून मरेल. अडचणीच्या वेळी मदत केली तर ती योग्य मानली जाते म्हणजे तो क्षण महत्वाचा आहे. **वेळेचे पालन करणारा ईश्वराला आवडतो. वेळ पालनाचा वेळेच्या नियोजनाशी संबंध आहे. उपलब्ध वेळ, नियोजित कार्य, साफल्य, यश, आनंद असा हा आदर्श जीवनाचा प्रवास आहे. हे समजावून सांगणे हाच या लेखाचा उद्देश आहे.** मोठ्या हुद्द्यावर काम करणारे लोक वेळेचे योग्य पालन करताना दिसतात कारण ते वेळेचे महत्व जाणतात. मानवी जीवनात प्रत्येक कामाला विशिष्ट वेळ दिलेली आहे. त्या त्या वेळीच ते ते काम नियोजित वेळेत पार पाडणे अपेक्षित असते. जो वेळेवर एखाद्याची मदत करतो, त्यालाही वेळेवर कुणाच्या तरी रूपात देवाची मदत मिळत असते. वेळेचे महत्व ज्याला कळते तो माणूस आपल्या हाताने आपले भाग्य लिहू शकतो.

पंडित श्रीराम शर्माजी म्हणत की जीवन म्हणजे वेळ. ज्याला वेळेचे महत्व समजले त्यालाच जीवनाचा खरा अर्थ कळला. मानवी जीवन हे आपल्याला एका मर्यादित काळासाठी प्राप्त झालेले आहे हे समजले तरच कोणताही माणूस वक्तशीरपणाचा अर्थ समजू शकेल अन्यथा नाही. कार्य सिद्धी, यश प्राप्ती किंवा जीवनाची यशस्विता ही मुख्यतः

कार्यकुशलते सोबतच वेळेचे नियोजन या गुणावरच आधारलेली दिसून येते. वक्तशीरपणा किंवा वेळ हा विषय गांभीर्याने समजण्याचा आहे. वेळेला किंमत न देणाऱ्याला या जगात कोणतीच किंमत मिळत नाही, हे ध्यानात घेणे गरजेचे आहे. वेळेचा सदुपयोग झाला नाही तर अभ्यासू किंवा सार्थक जीवन जगणाऱ्या व्यक्तीला वाईट वाटत असते. साधकाला वेळेची बचत करता आली पाहिजे. वेळेचे महत्व कळले तर स्वउन्नती सोबतच इतरांचीही उन्नती व्हायला मदत होत असते, हा त्रिकालाबाधित सिद्धांत आहे.

जीवनात विजयीमूर्त बनण्यासाठी जिद्द, चिकाटी, कठोर परिश्रम व तपःश्चर्या यासारख्या गुणांसोबत वक्तशीरपणा हा गुण जोपासणे देखील आवश्यक ठरते. जन्माला येऊन काहीतरी चांगले कार्य करून दाखवायचे असेल तर वक्त-शीरपणा या गुणाची समज हवी हेच खरे. मनुष्य जन्म अत्यंत दुर्मिळ व अमूल्य आहे. ते भगवंताचे वरदान आहे हे लक्षात आले तर कोणतीही व्यक्ती आपल्या उद्धाराचा प्रामाणिक प्रयत्न केल्याशिवाय राहणार नाही. अशी व्यक्ती वक्तशीरपणाचे माहात्म्य जाणून घेईल व आपला उद्धार करून घेईल. या गुणाने युक्त असणारा माणूस कर्तव्य-परायण किंवा आदर्श दिसून येतो. जीवन जगण्याच्या कलेत किंवा जीवनाच्या कुठल्याही क्षेत्रात यशस्वी होताना दिसून येतो. **शाश्वत आनंदाची प्राप्ती करून देणारा हा सद्‌गुण आहे, हेच खरे सार आहे. वक्तशीरपणाचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे सूर्य, नित्यनेमाने उगवतो आणि मावळतो. आपण वेळेला योग्य किंमत दिली पाहिजे हेच सांगून जातो. नाही का ? जणू काही काळ कुणासाठी थांबत नाही हेच तो सुचवीत असतो. तात्पर्य म्हणजे कोणतेही कार्य करण्यासाठी आधी योजना आखा आणि वेळेची नीट आखणी करा; जेणेकरून आपले कार्य निर्धारीत वेळेत पूर्ण होईल.**

केवळ दोन शब्द पतनासाठी तसेच उत्थानासाठी कारणी-भूत आहेत - 'मी आणि माझे' त्यामुळे जेव्हा 'मी' शब्द बोलता तेव्हा कुठला ना कुठला स्वमान बुद्धीत आणा. तसेच 'माझे' शब्द बोलता तेव्हा 'माझे शिवबाबा' स्मृतीत आणा म्हणजे सदैव आत्मिक उन्नती होत जाईल.

वाचकांशी हितगुज

- अमृतकुंभ व अमृतकलश या दोन्ही द्वैमासिकांचा विचार करता सन २०१५-१६ हे मराठी द्वैमासिकाचे ३१वे वर्ष आहे. आजवर वाचकांनी अतिशय उत्तम प्रतिसाद दिला. त्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार ! यापुढेही तो असाच मिळत राहील, अशी खात्री आहे कारण अमृतकुंभ हे आपणा सर्वांचे आवडते द्वैमासिक आहे. तसेच मराठी भाषिकांपर्यंत ईश्वरी ज्ञान पोचविणारे हे एकमेव द्वैमासिक आहे.
- मागील वर्षी महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर सुरू करण्यात आलेल्या अमृतकुंभच्या *E-magazine* या संकल्पनेला फार चांगला प्रतिसाद मिळत आहे. या संकल्पनेची माहिती आपल्या मित्र-परिवाराला देत जावी. त्यांना www.amrutkumbh.com या संकेत स्थळाला (*website*) भेट देण्यास सांगावे.
- वाचकांनी/सेवाकेंद्रांनी एप्रिल २०१५ पासून सुरू होणाऱ्या नवीन वर्षाची मागणी फेब्रुवारी २०१५ अखेरपर्यंत कळवावी म्हणजे त्यानुसार अंक छापणे सोयीचे होईल. **तसेच प्रत्येकाने अधिकाधिक सभासद संख्या वाढविण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवावे व ईश्वरी सेवा वृद्धींगत करण्यासाठी आवश्यक तो सहयोग द्यावा. मुख्य म्हणजे पुढील वर्षाची वर्गणी सध्या इतकीच ठेवण्यात आली आहे.**
- आपले काही विशेष अनुभव, लेख, कविता तसेच अमृतकुंभाविषयी काही सूचना असल्यास त्या अवश्य कळवाव्यात. -- ***प्रकाशक, अमृतकुंभ.***

निकट भविष्यात चोहिकडे अस्थिरता असेल त्यामुळे अचल स्थितीची आवश्यकता आहे. त्यासाठी कितीही जरी बिझी असलात तरी अधून-मधून अशरीरी बनण्याचा अभ्यास, आतापासून करा.

पिताश्री ब्रह्माबाबांनी आपला प्रत्येक सेकंद, प्रत्येक श्वास सफल केला. त्यामुळे बापसमान बनण्यासाठी तुम्ही देखील असेच करा व सफलतामूर्त बना.

ब्रह्माकुमारीज्द्वारे एक अपूर्व वैश्विक महाअभियान

७ अरब सत्कर्मांची महायोजना

(७ बिलीयन ॲक्टस् ऑफ गुडनेस)

ब्र.कु.डॉ.हरीन्द्र, वाराणसी.

आज धन कमावणे हेच प्रत्येक व्यक्तीचे एक सोनेरी स्वप्न अथवा जीवनाचा मुख्य पुरुषार्थ बनला आहे. कुणी वस्तूंचे उत्पादन आणि त्यांची विक्री करून तर कुणी आपल्या श्रमाच्या बदल्यात पैसा कमविण्याची रात्रंदिवस धडपड करत आहे कारण त्याचा असा समज झाला आहे की धनाने सर्व सुखसुविधांची प्राप्ती होते. परंतु तो हे विसरला आहे की जीवनात सुख-शांती प्राप्त करून देण्यात पैसा असमर्थ आहे. मनुष्याच्या भौतिकवादी विचारसरणीमुळे शहराला बाजाराचे व मनुष्याला उपभोक्त्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. मनुष्याची खुशी, मनोरंजनाची साधने त्याचबरोबर त्याची स्वप्नेसुद्धा विकली जात आहेत. झटपट धनवान बनविणाऱ्या स्वप्नांचा व्यापार, वर्तमानसमयी गुंतवणकीच्या दृष्टिकोनातून अतिशय फायदेशीर व्यापार बनला आहे. जर आपल्याजवळ धनवान बनण्याची एखादी युक्ती (आयडिया) असेल तर आपण खूप पैसा कमवू शकता. परंतु सत्य तर हेच आहे की अशाप्रकारे झटपट धनवान बनण्याच्या इच्छेमुळेच मनुष्य दिवसेंदिवस लुटला जात आहे. एका रात्रीत श्रीमंत बनण्याचे स्वप्न दाखविणारी कंपनी, सकाळ होताच गायब झालेली दिसते आणि निवेशक बिचारा फायनॅन्स कंपनीच्या बंद कार्यालयाच्या बाहेर चक्कर मारताना दिसतो.

❒ सत्कर्मांची महायोजना

लोकांची ही दीन-दुःखी व दरिद्रतापूर्ण अवस्था पाहून त्यांचे वर्तमान तसेच भविष्य जीवन संपन्न बनविण्यासाठी, त्यांना अरबपती नव्हे तर पद्मपती बनविण्यासाठी प्रजापिता ब्रह्माकुमारीज् द्वारे ७ अरब सत्कर्मांची महायोजना सुरू करण्यात आली आहे यात आपण प्रत्येकाने अवश्य सहभागी व्हावे. या महायोजनेचे डायरेक्टर स्वयं ज्योतिर्बिंदूस्वरूप परमपिता परमात्मा 'शिव' आहेत. त्यांची सर्व निवेशकांना (गुंतवणूकदारांना) ही गॅरंटी आहे की तुम्ही केलेल्या सत्कर्माची गुंतवणूक (निवेश) १०० प्रतिशत सुरक्षित आहे. तसेच त्यातून मिळणारा लाभांश हा तुम्हाला अरबपति बनवेल याची खात्री आहे. मुख्य म्हणजे विश्वभरात चालू असलेली आर्थिक मंदी, प्राकृतिक आपत्ती तसेच बदलत्या परिस्थितीमुळे होणारी उलथापालथ यांच्या दृश्य परिणामांपासून ही योजना पूर्णतः सुरक्षित आहे. या योजनेत सर्व धर्म, जाती, वयोगट, लिंग, भाषा, विभिन्न आर्थिक व शैक्षणिक गटातील बंधु-भगिनी सहभागी होऊ शकतात. ही योजना मर्यादित काळासाठी असल्याने, त्वरा करा. ही योजना ब्रह्माकुमारीज् संस्थेद्वारे आंतरराष्ट्रीय पातळीवर राबविली जात असल्याने या योजनेची गुणवत्ता पूर्णतः प्रमाणित आहे. या योजनेच्या अधिक माहितीसाठी www.actsofgoodness.org या संकेतस्थळाला (वेबसाईट) आपण अवश्य भेट द्या अथवा ब्रह्माकुमारीज् संस्थेच्या नजिकच्या सेवाकेंद्राशी संपर्क करा. त्याठिकाणी आपल्याला या महायोजनेचे फॉर्म्स् (प्रतिज्ञापत्र) विनामूल्य उपलब्ध होतील. **या योजनेअंतर्गत प्रतिदिन तीन सत्कर्म (एक महिना अथवा एक वर्ष) करण्याचा दृढ संकल्प करायचा आहे. त्यामुळे एका महिन्यात आपले ९० सत्कर्म अथवा २०१५ या वर्षात १०९५ (३६५×३) सत्कर्म जमा होतील या सत्कर्माद्वारेच आपण वर्तमान तसेच भविष्यात अरबपति वा पदम्पति बनणार आहात.** याखेरीज आपला परिवार, इष्ट मित्र, सहकर्मी, समुदाय, विद्यालय, महाविद्यालय, धार्मिक संघटना यांच्या माध्यमातून देखील आपण ही योजना राबवू शकता. दैनंदिन जीवनात करावयाच्या सत्कर्मात दुसऱ्यांवर दया करणे, क्षमा करणे, शांती आणि सद्भावना पसरविणे, सहयोग देणे, प्रेम करणे, खुशी वाटणे, आनंद पसरविणे, महिलांना सन्मान देणे, त्यांची सुरक्षा करणे, विकलांगांची सहायता करणे, विश्व-कल्याणासाठी योगदान करणे, प्रकृतीला योगदान करणे, यासारख्या नैतिक मूल्यांवर आधारित सत्कर्मांचा समावेश

आहे. तात्पर्य म्हणजे या सत्कर्मांच्याआधारेच सांप्रत महाकल्याणकारी संगमयुगात आपण अरबपति वा पद्मपति बनू शकता. त्यामुळे या सुवर्ण संधीचा अवश्य लाभ घ्या. ही संधी कुणीही दवडू नका, अशी सर्वांना कळकळीची विनंती आहे. तसेच आपल्या दैनंदिन सत्कर्मांची नोंद आपल्या डायरीत ठेवावी.

❒ गुंतवणूकीची अंतिम संधी

या योजनेत आपल्याला केवळ समय, श्रम, शक्ती व साहस यांचीच गुंतवणूक करावयाची आहे. जर आपण आजवर अरबपति बनण्याचे स्वप्न पाहिले असेल तर ते स्वप्न एका जन्मासाठीच नव्हे तर अनेक जन्मांसाठी साकार करण्याची हीच अंतिम सुवर्णसंधी आहे. **या योजनेत गुंतवणूक केल्याने आपल्या पुण्य कर्मात झपाट्याने वाढ होत जाईल. फलस्वरूप आपले आत्मबळ, ज्ञानबळ व परमात्मबळ वाढत जाईल. आपल्या जीवनात नवीन स्फूर्ती व आध्यात्मिक चेतना संचारित होत असल्याचा अनुभव होत राहिल.**

❒ गुंतवणूकीसाठी मुख्य पर्याय

वर नमूद केल्याप्रमाणे या योजनेत सत्कर्मांच्या गुंतवणूकीसाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत. याखेरीज अन्य कुठल्या प्रकारची सत्कर्मे आपण दैनंदिन जीवनात करायची यासाठी प्रत्येकाला स्वातंत्र्य आहे. त्यामुळे आपली मनोभावना जशी असेल त्याला अनुसरून आपण सत्कर्मांचा पर्याय निवडू शकतो. त्याचबरोबर दुसऱ्यांनाही या महा-योजनेत सहभागी होण्यासाठी प्रेरित करू शकतो. अशाप्रकारे दुसऱ्यांना सत्कर्मासाठी प्रेरित करणे हे सुद्धा फार मोठे पुण्यकर्म आहे आणि विशेष म्हणजे याची मर्यादा फार मोठी आहे. ती आहे ७ अरब अर्थात ७०० कोटी, जी सध्या जगाची लोकसंख्या आहे. उदाहरणार्थ, भारताचे पंतप्रधान मा.श्री.नरेंद्र मोदी यांनी नुकतेच सुरू केलेले 'स्वच्छ भारत अभियान' हे आज १२५ कोटी भारतीयांना प्रेरणा देण्यासाठी निमित्त बनले. तशीच आपली ही महा-योजना आंतरराष्ट्रीय स्तरावर राबविण्यात येत असल्याने तिची व्याप्ती ७ अरब लोकापर्यंत आहे. सारांशाने आपण प्रत्येकाने या योजनेत सहभागी झाले पाहिजे आणि अधिका-धिक बंधु-भगिनींना या योजनेत सहभागी होण्यासाठी उद्युक्त केले पाहिजे. (या महायोजनेच्या फॉर्मची नमुनाप्रत पान नंबर ३२ वर देण्यात आली आहे. ती कृपया पहावी.)

❒ सत्कर्मांच्या महायोजनेपासून होणारे लाभ

विश्वकल्याणाची सद्भावना तसेच त्यासाठी यथाशक्ती सहयोगाच्या प्रकंपनाद्वारे सुखमय जीवन जगण्यासाठी समर्पित अशी ही महायोजना आहे. भौतिकवाद व अज्ञान अंधःकारात भटकणाऱ्या आजच्या मानवाला, सुखमय जीवनाची संकल्पना साकार करण्यासाठी आवश्यक ती संधी याद्वारे प्राप्त होईल. म्हणून आपण सर्वांनी समाजातील सर्व लोकांना सत्कर्म करण्यासाठी प्रेरित केले पाहिजे. हे एकप्रकारे विश्व नवनिर्माण कार्यासाठी केलेले अमूल्य योगदान आहे. जेव्हा एखाद्या ठिकाणी रहाणारे सर्वजण एक विशेष संकल्प घेऊन त्यानुसार कार्य करतात तेव्हा तेथील वातावरण बदलून जाते. आपणही हे लक्ष्य डोळ्यापुढे ठेऊन आपल्या घरातील, सोसायटीतील, कार्यालयातील, गावातील, शहरातील वातावरण सकारात्मक व शक्तिशाली बनवू या. फलस्वरूप आपले जीवन सुखमय, सुरक्षित व समृद्ध बनेल. आपल्या जीवनात आध्यात्मिक उन्नतीचे नवीन प्रवेशद्वार उघडेल. आपल्याविषयी लोकांच्या मनात सद्भावना व शुभभावना निर्माण होईल. आपल्या जीवनात येणाऱ्या आपत्ती आपल्यासाठी अमूल्य उपहार बनतील. तसेच अन्य आत्म्यांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने ईश्वरी ज्ञान देण्यासाठी वा ईश्वरी सेवेचा सुअवसर देण्यासाठी आपण निमित्त बनल्याने, अरबपति बनण्याचे आपले स्वप्नसुद्धा साकार होईल. **मुख्य म्हणजे सत्कर्माद्वारे प्राप्त परमात्म दुवा (आशीर्वाद) आपल्या पुण्याच्या खात्यात जमा होत जातील, ज्यामुळे अनेक जन्मांसाठी आपल्याला सद्भाग्याची प्राप्ती होईल.**

(भावानुवाद : ब्र.कु. दत्तात्रयभाई, वसंतनगर-नांदेड)

प्रत्येकाला शुभभावना व शुभकामनांची गिफ्ट देत रहा. विशेषता द्या आणि विशेषता घ्या. गुण द्या आणि गुण घ्या. अशी गॉडली गिफ्ट (ईश्वरी भेटवस्तू) सर्वांना देत रहा. कुणी कुठलीही भावना वा कामना घेऊन तुमच्याकडे आले तरी त्याला शुभभावनेची गिफ्ट द्या.

ब्रह्माकुमारीज् द्वारे एक अपूर्व वैश्विक महाअभियान

७ अरब सत्कर्मांची महायोजना

(7 बिलियन ॲक्टस् ऑफ गुडनेस)

सत्कर्मांची अथवा खुशी प्राप्त करण्याची सतत् शृंखला

सत्कर्मासाठी माझे योगदान

मी दृढ संकल्प करतो/करते की, मी प्रतिदिन तीन सत्कर्म एक महिना वा एक वर्ष अवश्य करीन.

एकूण सत्कर्मांची संख्या एका महिन्यात ९० ☐ एका वर्षात १०९५ ☐

सत्कर्म करण्यासाठी काही उदाहरणे खाली दिली आहेत -

- ☐ दया
- ☐ क्षमा
- ☐ प्रेम
- ☐ सहयोग
- ☐ खुशी वाटणे
- ☐ आनंद पसरविणे
- ☐ शांती व सद्भावना पसरविणे
- ☐ विकलांगांची सहायता
- ☐ महिलांची सुरक्षा व सन्मान
- ☐ स्वतःच्या वा विश्वाच्या कल्याणासाठी ध्यानाभ्यास
- ☐ व्यर्थ विचार समाप्त करणे
- ☐ प्रकृतीच्या विषयी दया

या व्यतिरिक्त अन्य कोणते कार्य आपण करू शकता _____

सत्कर्माच्या पर्यायाची निवड : १) स्वतः २) मित्र/परिवार ३) सहकर्मी ४) समुदाय ५) विद्यालय/महाविद्यालय/विश्वविद्यालय ६) मंदिर/मस्जिद/चर्च/गुरुद्वारा/धार्मिक संघटन

--: **अधिक माहितीसाठी संपर्क करा** :--

7 बिलियन ॲक्टस् ऑफ गुडनेस, ब्रह्माकुमारीज् शांतिवन,
आनंद भवन, तिसरा माळा, आबू रोड - ३०७५१० (राजस्थान, भारत)
E-mail : 7billionactsofgoodness@gmail.com
Mobile No.:09414152358, 09694295675, 09414150740

कृपया खालील फॉर्म् भरून जवळच्या स्थानिक सेवाकेंद्रावर जमा करावा.

मी दृढ संकल्प करतो/करते की, मी प्रतिदिन तीन सत्कर्म एक महिना वा एक वर्ष अवश्य करीन.

नाव : _____ पद/व्यवसाय : _____

पत्ता : _____

दूरध्वनी/मोबाईल नं. : _____ ई-मेल : _____

प्रतिज्ञा करण्याची तारीखः _____ एकूण सत्कर्मांची संख्या : ☐

१. नागपूर : आर.एस.एस.चे महानगर संचालक श्री. राजेश लोया यांचा सत्कार करतांना राजयोगिनी पुष्पाराणी दीदी व ब्र.कु. करूणा भाई (मधुबन) **२. कल्याण** : 'अलविदा डायबिटीज' या कार्यक्रमाचे उद्‌घाटन करतांना ब्र.कु.डॉ. श्रीमंत साहू, कमिशनर नविन सोनावणे, ब्र.कु. अल्का व शिल्पा बहेन. **३. तेल्हारा (अकोला)** : 'एक शाम प्रभू के नाम' या कार्यक्रमाचे उद्‌घाटन करतांना ब्र.कु. अविनाश भाई, आमदार गोवर्धन शर्मा, ब्र.कु.रुक्मिणी बहेन व अन्य. **४. अहमदनगर** : राजयोगिनी उषा बहेन यांचा सत्कार करतांना विधानसभेचे विरोधी पक्षनेते श्री. विखे पाटील, उपनगराध्यक्षा सुवर्णा कोटकर, शेजारी ब्र.कु. राजेश्वरी दीदी. **५. सोलापूर** : स्व-प्रबंधन कार्यक्रमाच्या अंतर्गत आशीर्वचन देतांना ब्र.कु.सोमप्रभा दीदी, मंचासीन उपमहापौर श्री. डोंगरे, उपायुक्त श्री. माचकलवार व ब्र.कु.रेणुका. **६. मडगांव (गोवा)** : 'जीवन समृद्धी' कार्यशाळेचे उद्‌घाटन करतांना डॉ. महेश हेमाद्री (मधुवन), श्री. डिकॉस्ता, ब्र.कु.शोभा व सुरेखा बहेन. **७. वरठी (भंडारा रोड)** : विधायक भ्राता श्री. वाघमारे यांचे स्वागत करतांना ब्र.कु.उषा बहेन, शेजारी पत्रकार श्री. मेश्राम. **८.देऊळगावराजा** : आमदार श्री. खेडेकर यांचा सत्कार केल्यानंतर त्यांच्यासोबत बी.के. सुनंदा, शिवसेना शहर प्रमुख श्री. वाघमारे व अन्य.

Registration No. 033000/30/AL/85/NT/11

सोनई (राहूरी) : महाराष्ट्राचे राज्यपाल महामहिम श्री. सी. विद्यासागर राव हे '७ अरब सत्कर्मांची महायोजना' अंतर्गत संकल्पपत्र भरतांना, शेजारी ब्र.कु. उषा बहेन व ब्र. कु. दीपक भाई.

सातारा (कूपर कॉलनी) : येथे आयोजित कृषी प्रदर्शनाचे प्रसंगी माजी मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांना ईश्वरी भेटवस्तू देतांना ब्र.कु. कांचन बहेन, शेजारी डॉ. जाधव व अन्य.

अहमदनगर : सुप्रसिद्ध अभिनेत्री व सांसद हेमा मालिनी यांना '७ अरब सत्कर्मांची महायोजना' या विषयींची माहिती देतांना ब्र.कु. दीपक हरके.

उमरेड : 'माझी शाळा व्यसनमुक्त शाळा' या कार्यक्रमात भाषण करतांना ब्र.कु.डॉ. सचिन परब, मंचासीन खासदार श्री. तुमाने, आमदार श्री. सुधीर पारवे, ब्र.कु. रेखा दीदी व ब्र.कु.अशोक भाई.